# रायगड जिल्ह्यातील किल्ले

एम.ए. (इतिहास) सेम IV

शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१

सादरकर्ती

कु. कोमल दत्ताराम सावंत

मार्गदर्शक

प्रा. मंदार ठाकुर

आदर्श विद्या प्रसारक संस्थेचे

आदर्श कला आणि वाणिज्य महाविद्यालय

कुळगाव-बदलापूर

शैक्षणिक वर्ष

२०२०-२०२१

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | प्रकरण एक | |
| १.१ | प्रस्तावना | ४ |
| १.२ | विषयाची उद्‌दिष्टे | ५ |
| १.३ | विषयाची व्याप्ती, मर्यादा | ५ |
| १.४ | विषयाचे महत्त्व | ६ |
| २ | प्रकरण दोन | |
| २.१ | किल्ला या शब्दाचा अर्थ | ७ |
| २.२ | किल्ल्यांचे प्रकार | ८ |
| २.३ | महाराष्ट्रातील किल्ल्यांचा इतिहास | ८ |
| २.४ | किल्ल्याचे भाग | ८ |
| २.५ | किल्ल्यावरील ठिकाणांची नवे | ९-११ |
| ३ | प्रकरण तीन - रायगड जिल्ह्यातील किल्ले | |
| ३.१ | रायगड जिल्ह्याचे भौगोलिक स्थान | १२ |
| ३.२ | भौगोलिक वैशिष्टे | १३-१४ |
| ३.३ | रायगड जिल्ह्याचा इतिहास (प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक कालखंड ) | १५-२४ |
| ३.४ | कुलाबा संस्थानाचा शेवट | २४-२५ |

| | | |
|---|---|---|
| ४ | प्रकरण चार- किल्ले रायगड व किल्ले लिंगाणा | |
| ४.१ | किल्ले रायगड | २६-३३ |
| ४.२ | किल्ले लिंगाणा | ३४-३६ |
| ५ | प्रकरण पाच - किल्ले मुरुड-जंजीरा व किल्ले सुधागड | |
| ५.१ | किल्ले मुरुड-जंजीरा | ३७-४० |
| ५.२ | किल्ले सुधागड | ४१-४४ |
| ६ | प्रकरण सहा | |
| ६.१ | निष्कर्ष | ४५-४६ |
| ६.२ | छायाचित्रे | ४७-५५ |
| ६.३ | संदर्भ | ५६ |

## प्रकरण पहिले :

### १.१ प्रस्तावना:

भारतामध्ये प्राचीन काळापासून किल्ल्यांचे अस्तित्व आढळते. महाराष्ट्रामध्ये चिरकी नेवासा, इनामगाव दायमाबाद, जोर्वे याठिकाणी मोठ्या शिळा एकमेकांवर रचून संरक्षणात्मक तट उभारलेले आढळतात. रानटी पशु, नैसर्गिक आपत्ती व शत्रू यांच्यापासून संरक्षण करण्यासाठी किल्ल्यांचा उपयोग प्राचीन मानवाने केला. सुमेरियन व हडप्पा संस्कृतीमध्ये किल्ल्यांचे अवशेष आढळतात. भारतामध्ये इतिहासपूर्व काळापासून सुरु झालेली दुर्ग बांधणीची कला वैदिक काळ, महाजनपदे, मौर्य, गुप्त, राजपूत, सुलतान व मोगल काळापर्यंत दिवसेंदिवस विकसित होत गेली. हळूहळू या किल्ले बांधणीच्या तंत्रामध्ये विकास होत गेला.

मध्ययुगीन काळामध्ये युद्धपद्धती व युद्धतंत्रे यामध्ये बदल झाला. त्यामुळे किल्ल्यांचे महत्व या कालखंडामध्ये अधिकच वाढले. किल्ले हे राजसत्ता, सामर्थ्य, व स्थापत्यांचे प्रतिक बनले. मध्ययुगामध्ये भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर किल्ले उभारले गेले. किल्ले बांधताना ते अधिकाधिक दुर्गम करण्यात आले. भारतामध्ये महाराष्ट्र, राजस्थान, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, कर्नाटक या राज्यांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत अधिक किल्ले आहेत.

महाराष्ट्रामध्ये उत्तरेकडून दक्षिणेकडे लांबच्या लांब पसरलेल्या सह्याद्री पर्वतरांगांनी गिरिदुर्ग उभारण्यासाठी अनेक मोक्याच्या जागा पुरवल्या. याच सह्याद्री पर्वतांच्या पश्चिमेला जवळच समुद्रकिनारा आहे. खाडीच्या मुखाशी मिळणाऱ्या या डोंगर सूळक्यांचा उपयोग सुद्धा किल्ले बांधण्यासाठी झाला. याशिवाय समुद्रामध्ये निर्माण झालेल्या निसर्गनिर्मित बेटांनीसुद्धा दुर्गबांधणीस जागा पुरविली. सह्याद्रीमध्ये दिमाखाने उभ्या असलेल्या शेकडो गिरीदुर्गानी स्वराज्याच्या अंतर्गत प्रदेशाचे संरक्षण केले.

महाराष्ट्राच्या भौगोलिक परिस्थितीचे सखोल ज्ञान असलेल्या छत्रपती शिवरायांनी तिचा अचूक उपयोग स्वराज्याची स्थापना, विस्तार, संरक्षण व विकास यासाठी करून घेतला. महाराष्ट्रातील प्रत्येक दुर्गम जागेची त्यांनी किलेबंदी केली. प्राचीन काळापासून कोणत्याही राजाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या इतका किल्ल्यांचा उपयोग साम्राज्य रक्षणासाठी करून घेतला नाही. शिवरायांनी किल्ल्यांच्या बाळावरच दिल्लीच्या बादशाहीला व परकीयांना यशस्वीपणे तोंड दिले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या नंतर आलेल्या छत्रपती संभाजी महाराज, राजाराम महाराज, ताराबाई, शाहू या राज्यकर्त्यांनी व त्यांच्या हजारो सहकाऱ्यांनी किल्ल्यांचे महत्व जाणले होते. मोगल बादशाह औरंगजेबाने पंचवीस वर्षे सतत आक्रमणे करून सुद्धा मराठ्यांचे राज्य नामशेष झाले नाही. याचे सर्वात महत्वाचे कारण म्हणजे मराठ्यांच्या राज्याचे खरे सामर्थ्य या किल्ल्यांमध्ये होते. त्यामुळेच पेशवे दुसऱ्या बाजीरावाचा पराभव केल्यानंतर मराठ्यांच्या सामर्थ्याचे खच्चीकरण करण्यासाठी इंग्रजांनी जाणीवपूर्वक सुरुंग लाऊन अनेक अजिंक्य किल्ले नामशेष केले.

## १.२. विषयाची उद्दिष्टे :

अनेक परकीय व भारतीय अभ्यासकांनी महाराष्ट्रातील किल्ल्यांचा अभ्यास व संशोधन केले आहे. प्रस्तुत प्रकल्पामध्ये रायगड जिल्ह्यातील काही किल्ल्यांचा अभ्यास केलेला आहे, हा अभ्यास करताना खालील उद्दिष्टे ठेवली होती.

१) इतिहासपूर्व काळापासून भारतामध्ये आदिमानवाने संरक्षणासाठी तटबंदीचा उपयोग केला. या संरक्षणात्मक बांधकामाचा विकास मध्ययुगामध्ये दुर्गम किल्ल्यांच्या रुपामध्ये झाला. महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. महाराष्ट्रातील भौगोलिक स्थिती व किल्ल्यांची संख्या यांच्यातील परस्पर संबंध शोधणे.

२) ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये उल्लेख असलेल्या रायगड जिल्ह्यातील किल्ले व प्रत्यक्षात अस्तित्वात असणारे किल्ले यांची ओळख पटवणे.

३) रायगड जिल्ह्यातील किल्ल्यांची तपशीलवार माहिति पाहणे.

४) रायगड, लिंगाणा, सुधागड, मुरुड-जंजीरा या किल्ल्यांच्या शिवकाळातील ऐतिहासिक भूमिकेचा मागोवा घेणे.

५) कोकण मधील लष्करी हालचालीच्या काळामध्ये रायगड, लिंगाणा, सुधागड, मुरुड-जंजीरा या किल्ल्यांचे लष्करी डावपेचांमधील महत्त्व तपासणे.

## १.३. विषयाची व्याप्ती व मर्यादा :

सध्या अस्तित्त्वात असणाऱ्या रायगड जिल्ह्याच्या सीमा अंतर्गत मर्यादित असलेल्या किल्ल्यांची माहिती व ओळख पटविण्याचा प्रयत्न केला आहे. किल्ल्यांचे

विविध ऐतिहासिक कागदपत्रांमधील , संदर्भ ग्रंथांमधील उल्लेख, विविध अभ्यासक व गिर्यारोहकांनी केलेल्या नोंदी या सर्वांचा तुलनात्मक अभ्यास करून रायगड जिल्ह्यातील किल्ल्यांची संख्या निश्चित केली आहे. रायगड जिल्ह्यामध्ये एकूण ३४ किल्ले आहेत. या सर्व किल्ल्यांचा अभ्यास करणे अशक्य असल्याने यांपैकी काही किल्ल्यांचा म्हणजेच रायगड, लिंगाणा, सुधागड, मुरुड-जंजीरा या किल्ल्यांच्या शिवकाळातील इतिहासाचा सूक्ष्मपणे मागोवा घेतला आहे. या किल्ल्यांचा शिवकालीन इतिहास तसेच या किल्ल्यांवरील पाहण्यासारखी ठिकाणे त्याचप्रमाणे या किल्ल्यांवर पोचण्यासाठीच्या वाटा याविषयी माहिती दिलेली आहे. मध्ययुगीन काळामध्ये रायगड जिल्ह्यातील प्रस्तुत किल्ल्यांचा महाराष्ट्रातील इतर किल्ल्यांशी प्रशासकीय आंतरसंबंध होता. परंतु विषयाची व्याप्ती वाढत असल्यामुळे त्याचे विश्लेषण सविस्तरपणे घेतले नाही. हि या विषयाची मर्यादा आहे.

## १.४. विषयाचे महत्त्व :

रायगड जिल्ह्यातील किल्ले, या विषयावर अभ्यास करताना रायगड जिल्ह्याची भौगोलिक स्थिती व रायगड जिल्ह्यातील किल्ल्यांचे स्थान यांचे परस्पर संबंध असल्याचे जाणवते. विविध साहित्यांचा तुलनात्मक अभ्यास करून रायगड जिल्ह्यातील किल्ल्यांची संख्या व यादीकरण निश्चित करता आले. तसेच या किल्ल्यांच्या इतिहासाचा स्थूलमानाने आढावा घेता आला.

रायगड, लिंगाणा, सुधागड, मुरुड-जंजीरा या किल्ल्यांचे लष्करी, व्यूहरचनेतील महत्त्व, रायगड सारख्या महत्वाच्या किल्ल्याभोवतीच्या संरक्षक वलयातील स्थान, दुय्यम सहाय्यक किल्ले म्हणून भूमिका प्रस्तुत प्रकल्पामध्ये प्रदर्शित केली आहे. मध्ययुगीन इतिहासामध्ये उपरोक्त किल्ल्यांना लष्करी व राजकीयदृष्ट्या महत्त्व होते.

## प्रकरण दुसरे :

## २.१. किल्ला या शब्दाचा अर्थ :

किल्ला या शब्दाची विश्वकोशिय व संस्कृतीकोषीय व्याख्या अनुक्रमे पुढीलप्रमाणे आहे. शत्रूंपासून संरक्षण करण्यास सुलभ जावे आणि सभोवतालच्या प्रदेशावर नियंत्रण ठेवता यावे, म्हणून बांधलेल्या वास्तुस किल्ला म्हणतात. सभोवती तटबंदी करून म्हणजे मजबूत भिंती बांधून जे सुरक्षित स्थान निर्माण केले जाते, त्याला किल्ला म्हणतात. Fort या संज्ञेचा स्थापत्य शिल्पकोशीय अर्थ गड, किल्ला, दुर्ग, कोट, कुट, कोटी, भूमिकोट, भुईकोट असा दिला आहे. संरक्षणासाठी बांधलेल्या अशा वास्तूला इंग्रजीत फोर्ट, किल्ला व दुर्ग या शब्दांचे इंग्रजी, मराठी व हिंदी शब्दाकोशीय अर्थ खालीलप्रमाणे दिले आहेत.

Fort - a fortified military building, enclosure or position (from Latin fortis “strong”), Fort - a strong building that is used for military defence

लष्करी संरक्षणासाठी वापरायची दणकट इमारत, किल्ला, कोट.

मराठीमध्ये किल्ला या शब्दाचा अर्थ संरक्षणासाठी तटबंदी केलेली जागा, गड, दुर्ग. किल्ला Castle किला या हिंदी शब्दाचा अर्थ लडाई के समय बचाव के लिये बनाया हुआ सुदृढ स्थान,दुर्ग, गढ, किला या हिंदी शब्दाचा अर्थ विशेष प्रकार का वह बडा और दृढ भवन जिसमे राजा और सिपाही आदी रहते है, दुर्गम, कठीण, किल्ला, गढ, कोट.

या सर्वावरून किल्ला म्हणजे लष्करी दृष्टीने संरक्षित केलेली वास्तू होय. जगप्रसिध्द व समृद्ध असलेल्या प्राचीन रोमन संस्कृतीत किल्ले बहुधा उंच ठिकाणी बांधत. दारुगोळा व तोफांच्या युद्धातील वापराबरोबर किल्ल्यांच्या प्राचीन बांधणीत परिवर्तन होऊ लागले. या गडकोटांचे सामर्थ्य वाढवण्यात शेकडो वर्षे मानवी बुद्धी व कौशल्य खर्ची पडले. त्यामुळे संरक्षणाचे हे साधन कार्यक्षम व सामर्थ्यवान झाले. शत्रूंच्या शस्त्रास्त्रांच्या वाढत्या विविधतेबरोबर आपापली राहण्याची ठिकाणे भक्कम करण्याची प्रवृत्ती वाढत गेली. युरोपमध्ये सतराव्या शतकात रेखागणीताच्या आधारे किल्ल्यांची बांधणी करण्याचा पुरस्कार मार्ची नावाच्या वास्तुविशारदाने केला. अठराव्या शतकात कॉर्माटेन या फ्रेंच वस्तुतज्ञाने किल्ल्यांभोवतीचे खंदक व तटबंदी यांच्या बांधकामात सुधारणा केल्या.

## २.२. किल्ल्याचे प्रकार :

किल्ल्याचे बांधकाम करण्यात आलेल्या स्थानावरून त्याचे प्रकार पडतात. आपल्याला किल्ल्याचे मुख्य तीन प्रकार माहित असतात. गिरिदुर्ग म्हणजेच डोंगरी किल्ला, जलदुर्ग म्हणजेच समुद्रात बेटांवर बांधण्यात आलेला किल्ला आणि भुईदुर्ग म्हणजेच सपाट भू भागावर बांधण्यात आलेला किल्ला. परंतु या व्यतिरिक्त देखील किल्ल्यांचे काही प्रकार आहेत.

वनदुर्ग म्हणजे अरण्यात असलेला किल्ला, गव्हरं म्हणजेच एखाद्या गुहेचा उपयोग करून त्याचा वापर किल्ल्यासारखा होत असेल तर, कर्दमं म्हणजे चिखलात किंवा दलदलीच्या प्रदेशात बांधण्यात आलेला किल्ला, तसेच केवळ कोट किंवा गढी स्वरूपातील इमारती किल्ल्याप्रमाणेच मानल्या जातात.

## २.३. महाराष्ट्रातील किल्ल्यांचा इतिहास :

महाराष्ट्र हा असा प्रदेश आहे, ज्या ठिकाणी वेगवेगळ्या प्रदेशातील परकीयांनी राज्य केलेले आहे. त्यामुळे महाराष्ट्रात बांधण्यात आलेल्या किल्ल्यांवर या परकीयांच्या बांधकाम कौशल्याची छाप दिसून येते. महाराष्ट्रात बांधण्यात आलेल्या किल्ल्यांमध्ये आफ्रिकन लोकांपासून ते युरोपीय लोकांपर्यंत सर्वांच्या कौशल्याचा सहभाग आहे. दोन हजार वर्षांपूर्वीच्या सातवाहन राजवंशापासून ते राष्ट्रकूट, चालुक्य, शिलाहार, यादव, कदंब, बहमनी, मोगल, दक्षिणी पातशाहया, मराठेशाही, पेशवाई, हबशी, पोर्तुगीज, डच आणि इंग्रज अशा वेगवेगळया काळातल्या सत्ताधीशांनी हे किल्ले बांधलेले आहेत.

## २.४. किल्ल्याचे भाग :

किल्ला बांधत असताना किंवा किल्ला बांधणीची जागा हेरत असताना विशेष काळजी घेतली जात असे, त्यानुसार किल्ला बांधलेल्या जागेचे चार भाग पडतात. घेरा, मेट, माची आणि बालेकिल्ला हे किल्ल्याचे मुख्य भाग आहेत. घेरा म्हणजे किल्ल्याच्या पायथ्याजवळ असलेले गाव, मेट म्हणजे किल्ला आणि गाडीतळाजवळील गाव यांच्यामध्ये असणारी मोक्याची तटबंदी रहित जागा, माची

म्हणजे किल्ल्यावरील बालेकिल्ल्याखालील सपाट प्रदेश आणि शेवटी बालेकिल्ला म्हणजे किल्ल्यावरील सर्वात संरक्षित ठिकाण होय.

## २.५. किल्ल्यांवरील ठिकाणांची नावे:

किल्ल्यावर बांधण्यात आलेल्या प्रत्येक इमारतीस, प्रत्येक बांधकामास विशिष्ठ नावे देण्यात आलेली आहेत. काही किल्ल्यांना विशिष्ठ प्रकारे बांधण्यात आलेल्या माच्या, तटबंदी, प्रवेशद्वार असतात. त्यानुसार त्या किल्ल्यांचे महत्व बदलत जाते.

### २.५.१. महादरवाजा :

किल्ल्यात प्रवेश करण्यासाठी बांधण्यात आलेल्या मुख्य प्रवेशद्वारास महादरवाजा असे म्हणतात. काही किल्ल्यांवर महादरवाज्याच्या संरक्षणासाठी बुरुजांची रचना केलेली असते. काही किल्ल्यांवर एकामागोमाग एक असे अनेक दरवाजे असतात. प्रवेशद्वाराच्या आतील बाजूस पहारेकऱ्यांना बसण्यासाठीची जागा ठेवलेली असे, त्यास 'देवडी' असे म्हणतात.

### २.५.२. नगारखाना :

किल्ल्याच्या मुख्य प्रवेशद्वारावर नगारखाना असे. गडाची दारे उघडताना आणि बंद करत असताना तसेच महत्त्वाच्या प्रसंगी येथे नगारे वाजवले जात.

### २.५.३. तटबंदी :

किल्ल्याची माची आणि बालेकिल्ला या भागात दगडी बांधकामात बांधण्यात आलेल्या भिंती आहेत, या भिंतींना 'तटबंदी' असे म्हणतात. किल्ल्याच्या दिशेने तोफेच्या गोळ्याचा मारा झाला, तर किल्ल्यावर त्याचा परिणाम कमी व्हावा, याकरिता तटबंदीची भिंत नागमोडी बांधत असत.

### २.५.४. बुरुज :

तटबंदीमध्येच काही ठराविक अंतरावर तटबंदीपासून पुढे आलेले बुरुज बांधले जात असत. हे बुरुज काही किल्ल्यांवर अर्धगोलाकार, त्रिकोणी, षटकोणी तर काही किल्ल्यांवर कमळाच्या फुलाच्या आकारात बांधण्यात आलेले आहेत. या बुरुजांवर तोफा ठेवल्या जात असत.

### २.५.५. ढालकाठी :

ढालकाठी म्हणजे निशाण रोवण्यासाठी बांधलेला दगडी ओटा होय. ढालकाठी बहुधा एखाद्या बुरुजावर उभारण्यात येत असे.

### २.५.६. जंग्या :

तटबंदी आणि बुरुजावरून गोळीबार करण्यासाठी ठिकठिकाणी छिद्रे ठेवलेली असत, त्यांना जंग्या म्हणतात.

### २.५.७. चऱ्या :

किल्ल्याच्या तटबंदी आणि बुरुजावर घडीव किंवा पाकळ्यांच्या आकाराचे दगड ठेवलेले असत, त्यांना चऱ्या असे म्हणतात. या चऱ्यांच्या आड लपून किल्ल्यावरून गोळीबार करता येत असे.

### २.५.८. फांजी :

किल्ल्याच्या तटबंदीवर पहारेकऱ्यांना गस्त घालण्यासाठी जागा ठेवलेली असे, त्यास 'फांजी' म्हणतात.

### २.५.९. धान्य कोठार (अंबरखाना) :

किल्ल्यावर धान्य साठवण्यासाठी बांधलेली इमारत म्हणजे धान्य कोठार (अंबरखाना).

### २.५.१०. दारू कोठार :

किल्ल्यावरील दारूगोळा या कोठारामध्ये साठवला जात असे. हे दारू कोठार लोक वस्तीपासून दूर बांधले जात असे.

### २.५.११. पागा :

किल्ल्यावर घोडय़ांना बांधून ठेवण्यासाठी बांधण्यात आलेल्या जागेस पागा असे म्हणतात.

### २.५.१२. चोर दरवाजा :

प्रत्येक किल्ल्यावर येण्यासाठी महादरवाजा सोडून इतरही एक ते तीन दरवाजे असत, छोट्या वाटेचे अथवा चढाईस कठीण असलेल्या अशा दरवाज्यांना चोर दरवाजा असे म्हणत असत. हे चोर दरवाजे तटबंदीमध्ये लपवलेले असत. छुप्या पद्धतीने केल्या जाणाऱ्या अनेक कामांसाठी या दरवाज्यांचा उपयोग होत असे.

### २.५.१३. पाण्याचे टाक/ तलाव/ विहीर :

किल्ल्यावर पिण्याच्या पाण्याचा साठा असावा या उद्देशाने ठिकठिकाणी टाक, तलाव आणि विहिरी बांधलेल्या असत. या पाण्याच्या साठ्यांची विशेष काळजी घेतली जात असे.

### २.५.१४. राजवाडा अथवा इमारती :

किल्ल्यावर राहणाऱ्या खास मंडळींसाठी राजवाडे, कचेरी, सदर इत्यादी इमारती बांधलेल्या असत. काही किल्ल्यांवर अशा काही विशिष्ठ इमारती आहेत, ज्यांना विशेष महत्व आहे.

### २.५.१५. शिलेखाना :

शिलेखाना म्हणजे चिलखते आणि शस्त्रास्त्रे ठेवण्याची जागा होय. याठिकाणी अवजारांना धार लावणारे शिकलगार आणि लोहार नेमलेले असत.

### २.५.१६. कडेलोटाची जागा :

गुन्हेगारास शिक्षा म्हणून, त्याला किल्ल्यावरून खाली ढकलून दिले जात असे, किल्ल्यावरील ज्या ठिकाणावरून खाली ढकलले जात असे, त्या जागेस कडेलोटाची जागा असे म्हणत.

किल्ला कसा पहावा याचं देखील एक तंत्र असतं, प्रत्येकाने किल्ल्याची वाट चालत असताना हे तंत्र पाळत आणि किल्ल्याचे सौंदर्य अनुभवत दुर्ग भ्रमंती करायला हवी. दुर्ग भ्रमंती करत असताना ज्या व्यक्तीचे त्या किल्ल्यासंबंधी काही वाचन आहे, ती व्यक्ती कल्पनाशक्तीच्या आधारे किल्ल्यांचे सौंदर्य आणि इतिहास अनुभवू शकते.

## प्रकरण तीन :

## रायगड जिल्ह्यातील किल्ले

रायगड जिल्ह्याला ऐतिहासिक आणि भौगोलिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. अरबी समुद्राच्या तटांवर स्थित असलेला हा रायगड जिल्हा तिन्ही बाजूंनी हिरव्यागार नारळाच्या झाडांनी व उंच पर्वतांनी वेढलेला आहे. रायगड जिल्ह्याला छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारभाराची राजधानी म्हणून मान प्राप्त झाला आहे. शिवाजी महाराजांच्या पवित्र चरणांनी या भूमीला स्पर्श केलेला आहे. ह्या अतुलनीय जिल्ह्यात अजिंक्य असा मुरुड-जंजीरा किल्ला स्थित आहे. जवळ जवळ ३४ छोटे मोठे किल्ले असलेल्या ह्या रायगड जिल्ह्याचे विभाजन १५ तालुक्यांमध्ये केलेले आहे. “दक्षिण कशी” म्हणून संबोधले जाणारे हरिहरेश्वर हे ठिकाण रायगडात स्थित आहे. सी.डी.देशमुख व स्वर्गवासी परमपूज्य पांडुरंगशास्त्री आठवले यांसारख्या थोर पुरुषांनी रायगडात जन्म घेतला आहे. आचार्य विनोबा भावे यांचा जन्म गागोदे गावात झाला. या प्रकारे रायगडला सामाजिक पार्श्वभूमी देखील लाभली आहे.

औद्योगिक क्षेत्रातही रायगड प्रगती पथावर असून येथील अलिबाग, पनवेल, महाड, उरण तालुक्यांमध्ये हजारो कोटींची औद्योगिक गुंतवणूक आहे. रायगड जिल्हा हा मुंबई लगतचा कोकणातील औद्योगिक जिल्हा असल्या कारणाने भारताच्या कानाकोपऱ्यातून उदरनिर्वाहासाठी येथे जनता स्थित झाली आहे. रायगड जिल्ह्यात मासेमारीमुळे मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल होते. शिवाय पर्यटनामुळे येथील अनेक स्थानिक बेरोजगारांना रोजगार मिळाला आहे.

### ३.१. रायगड जिल्ह्याचे भौगोलिक स्थान :

महाराष्ट्र राज्याला लाभलेल्या सुमारे ७२० कि.मी. लांबीच्या समुद्रकिनाऱ्या लगत कोकण पट्टीत मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग अशा एकूण सहा जिल्ह्यांचा समावेश आहे. यापैकी रायगड जिल्ह्याला २४०कि.मी. समुद्रकिनारा लाभला आहे. रायगड जिल्हा १७.५१ अंश उत्तर ते १९.८० अंश उत्तर अक्षांश आणि ७२.५१ अंश पूर्व ते ७३.४० अंश पूर्व रेखांश यामध्ये पसरलेला आहे. जिल्ह्याची पूर्वेकडील सीमा सह्याद्री पर्वताच्या लहान मोठ्या रांगांनी वेढलेली असून, त्याला लागून पुणे जिल्ह्याची हद्द सुरु होते. जिल्ह्याच्या

पश्चिमेला अरबी समुद्र असून दक्षिणेला असलेल्या सावित्री नदीने रत्नागिरी व रायगड जिल्ह्याची दक्षिण सीमा निश्चित केली आहे. अग्नेय दिशेला सातारा, उत्तरेला ठाणे तर वायव्येला मुंबई शहर हे जिल्हे आहेत.

## ३.२. भौगोलिक वैशिष्टे :

भौगोलिकदृष्ट्या रायगड जिल्हा साधारणपणे तीन चिंचोळ्या पट्ट्यात विभागला गेलेला आहे. अ) समुद्र किनाऱ्यालगतचा पट्टा, ब) सुपीक व सपाट जमिनीचा मध्य भागातील पट्टा, क) पूर्वेकडील सह्याद्रीचा डोंगराळ भाग.

जिल्ह्यात समुद्र किनाऱ्यालगतच्या पट्ट्यात उरण, अलिबाग, मुरुड, श्रीवर्धन या तालुक्यांचा समावेश होतो. अलिबाग शहर हे जिल्ह्याच्या मुख्यालयाचे ठिकाण असून समुद्र किनाऱ्या लगत वसलेले आहे. मध्य भागातील जमिनीचा पट्टा साधारणपणे सपाट व सुपीक आहे. जिल्ह्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या सुमारे १/३ भाग या पट्ट्याने व्यापलेला आहे. यामध्ये प्रामुख्याने भाताचे पिक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. पूर्वेकडे असलेले कर्जत, खालापूर तालुके व माणगाव, महाड तालुक्यांच्या ईशान्येकडील भाग आणि सुधागड, पोलादपूर तालुक्यांचा काही भाग सह्याद्री पर्वताच्या रांगांनी व्यापलेला आहे. जिल्ह्याच्या अतिपूर्वेकडील भाग डोंगर उतरणीचा असल्यामुळे तेथे शेती करता येत नाही. त्याचप्रमाणे जंगले सुद्धा फारशी नाहीत. त्यामुळे या भागात राहणाऱ्या लोकांचे जीवन अत्यंत कष्टाचे आहे. मैदानी भाग वगळल्यास जिल्ह्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी बराच भाग डोंगर व उंच सखल पर्वतरांगांनी व्यापलेला आहे. त्याचप्रमाणे समुद्र सपाटीपासून उंचीवर असणारी काही महत्वाची पर्वत शिखरे पुढीलप्रमाणे आहेत. महाल मिऱ्या (३३५ मी.), सरसगड (४३६.८ मी.), कर्नाळा (४७५ मी.), रतनगड (५८४ मी.), सागरगड (४१४ मी.), माणिकगड (५७२.४ मी.), सुधागड (६०४ मी.) व जिल्ह्यात महाराष्ट्राचे गौरव स्थान असलेला इतिहास प्रसिद्ध रायगड किल्ला (८७० मी.) आहे. किल्ल्याचे डोंगर सह्याद्री पर्वताच्या तुटलेल्या रांगांचे भाग आहेत.

जिल्ह्यात उत्तरेकडील भागात उल्हास, पाताळगंगा आणि आंबा, मध्य भागात कुंडलिका आणि दक्षिण भागात सावित्री, घोड आणि काळ या महत्त्वाच्या नद्या आहेत.

जिल्ह्याच्या सुमारे २४० कि.मी. लांबीच्या समुद्र किनाऱ्यावर बागमांडला, व दिघी (तालुका श्रीवर्धन) रेवदंडा, रेवस (तालुका अलिबाग) मोरा (तालुका उरण) राजपुरी (तालुका मुरुड) इत्यादी स्थानिक महत्त्वाची बंदरे आहेत.

मुंबई बंदरासमोरच या जिल्ह्यातील उरण तालुक्यातील न्हावा-शेवा हे एक नवीन अत्याधुनिक बंदर बांधले आहे. या बंदरामुळे मुळच्या मुंबई बंदरावरील तान कमी झाला आहे.

जिल्ह्याचे क्षेत्रफळ ७,१५२ चौ.कि.मी. असून, ते महाराष्ट्र राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या २.२७ टक्के इतके आहे. रायगड जिल्हा कोकण महसूल विभागात येत असून प्रशासकीय कामाच्या दृष्टीने अलिबाग, पेण, पनवेल, कर्जत, रोहा, महाड, श्रीवर्धन व माणगाव असे आठ उपविभाग आहेत. जिल्ह्यात एकूण पंधरा तालुके आहेत. सदर पंधरा तालुक्यांची विभागवार वर्गवारी खालीलप्रमाणे आहे.

१. अलिबाग : अलिबाग, मुरुड.

२. पेण : पेण, उरण.

३. पनवेल : पनवेल.

४. कर्जत : कर्जत, खालापूर.

५. रोहा : रोहा, सुधागड.

६. महाड : महाड, पोलादपूर.

७. श्रीवर्धन : श्रीवर्धन, म्हसळा.

८. माणगाव : माणगाव, तळा.

जिल्ह्यात सर्वात जास्त क्षेत्रफळ महाड तालुक्याचे तर सर्वात कमी क्षेत्रफळाचा उरण तालुका आहे. जिल्ह्यात एकूण १९१९ गावे असून त्यापैकी ६० गावे ओसाड आहेत. अलिबाग तालुक्यात सर्वात जास्त म्हणजे २१५ गावे आहेत. तर उरण व तळा तालुक्यात सर्वात कमी म्हणजे प्रत्येकी ६२ गावे आहेत. जिल्ह्यात एकूण २६ शहरे असून ११ शहरांचे प्रशासन नगरपालिका चालवतात.

जिल्ह्यात नैॠत्य मोसमी वाऱ्यापासून साधारणतः जून ते ऑक्टोबर महिन्यात पाऊस पडतो. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी एक त्याशिवाय माथेरान येथे एक अशी एकूण १६ पर्जन्यमान केंद्रे आहेत.

जिल्ह्यात हवामान दमट (आर्द्र ) आहे. जिल्हा समुद्रकिनाऱ्या लगत असल्याने दिवसा, रात्री त्याचप्रमाणे विभिन्न ऋतूतील उष्ण तापमानात विशेष बदल होत नाही. उन्हाळ्यात आर्द्रता जास्त असते.

२०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील लोकसंख्येची घनता दर चौ.कि.मी. ला ३६८ आहे. निरनिराळ्या तालुक्यातील घनतेचा विचार केला तर उरण तालुक्यात सर्वात जास्त (७५३) तर सुधागड तालुक्यात सर्वात कमी (१३५) घनता आढळून येते. २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २६,३४,२०० इतकी आहे. या लोकसंख्येपैकी ५१.०३ टक्के पुरुष तर ४९.९७ टक्के स्त्रिया आहेत. एकूण लोकसंख्येचा विचार केल्यास पनवेल तालुक्यात सर्वात जास्त तर तळा तालुक्यात सर्वात कमी लोकसंख्या आहे. २००१ ते २०११ या दहा वर्षात जिल्ह्याची लोकसंख्या १९.३१ टक्क्यांनी वाढली आहे. ग्रामीण लोकसंख्येच्या बाबतीत झालेली घट ०.५४ टक्के तर नागरी लोकसंख्येच्या बाबतीत ८१.४० टक्के वाढ झाल्याचे दिसते.

## ३.३. रायगड जिल्ह्याचा इतिहास :

१९८१ पर्यंत रायगड जिल्हा हा 'कुलाबा' या नावाने ओळखला जात होता. कुलाबा या नावालाही ऐतिहासिक पर्श्वभूमी होती. कुलाबा हा शब्द भौगोलिक असून शब्द व्याप्ती शास्त्रानुसार त्याचा अर्थ जमिनीची समुद्रात गेलेली लांबच लांब अशी 'दांडी अथवा 'भूशीर' होय. रायगड जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या अलिबाग या शहराच्या नजिक कुलाबा हा किल्ला (जलदुर्ग) आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याच्या निर्मितीनंतर या किल्ल्याचे बांधकाम केले. कुल म्हणजे बाजू व आप म्हणजे पाणी. त्यामुळे कुल-आप मिळून कुलाबा म्हणजे ज्याच्या चारही बाजुला पाणी असलेला किल्ल्यासारखा टेकडीचा भाग म्हणून या जलदुर्गाला 'कुलाबा' हे नाव पडले असावे अशी येथील स्थानिकांमध्ये आख्यायिका आहे.

भारतावर ब्रिटिशांचे राज्य प्रस्थापित झाल्यानंतर प्रशासनाच्या सोयीसाठी त्यांनी वेगवेगळे प्रांत निर्माण केले. या प्रांतांची विभागणी अनेक जिल्ह्यांमध्ये केली.

ब्रिटिशांनी सन १८१८ मध्ये मराठी सत्तेच्या शेवट केला. त्याही पूर्वी १७५६ मध्ये रायगड जिल्ह्याचा काही भाग त्यांनी पेशव्यांकडून हस्तगत केला होता. मुंबई बेटावर ब्रिटिषांचे वर्चस्व असल्याने मुंबई लगत असलेल्या रायगड जिल्ह्यात याच काळात त्यांचा शिरकाव झालेला होता.

पेशवाईच्या अस्तानंतर राजपुरी (मुरुड), साक्षी (पेण), व रायगड (महाड) हे तीन उपविभाग ब्रिटिश अंमलाखाली आले. यावेळी कुलाबा हे स्वतंत्र संस्थान होते. आंग्रे हे या संस्थानाचे संस्थानिक होते. पेणच्या उत्तरेकडील व पनवेलच्या दक्षिणेकडील काही खेडी १८३९ पर्यंत आंग्रे यांच्या ताब्यात होती. १८३९ मध्ये कान्होजी आंग्रे (दुसरे) हे मरण पावल्यानंतर ब्रिटिशांनी कुलाबा हे संस्थान खालसा केले व ते ब्रिटिश साम्राज्याचा एक भाग बनले. कुलाबा संस्थानाच्या प्रदेशांवर ब्रिटिशांनी पोलिटिकल सुपरिटेंडेंटची नेमणूक करून त्याला १८४४ च्या अधिनियम १७ अनुसार पोलिटिकल एजंटचा दर्जा दिला. तेव्हापासून या प्रदेशावर सर्व प्रकारचे ब्रिटिश कायदे व नियंत्रण लागू करण्यात आले. १८४४ च्या कायद्यानुसारच ऑक्टोबर १८४४ मध्ये कुलाबा संस्थानातील उत्तरेकडील काही गावे तत्कालीन ठाणे जिल्ह्यामध्ये समाविष्ट करण्यात आली.

१८४८ ते १८५६ या काळात लॉर्ड डलहौसी हा भारताचा गव्हर्नर जनरल म्हणून कार्यरत होता. त्याच्या कारकीर्दीत संस्थाने खालसा करण्याचे धोरण अधिक प्रभावीपणे राबविण्यात आले. कुलाबा संस्थानाचे ब्रिटिश साम्राज्यातील विलीनीकरण हे देखील त्याच्याच धोरणानुसार १८५३ मध्ये अधिक परिणामकारक रित्या करण्यात आले. कुलाबा संस्थानाच्या बाहेरील राजपुरी (मुरुड), साक्षी (पेण), व रायगड (महाड) हे उपविभाग व काही लहान लहान महाल यांचा समावेश करून कुलाबा हा उपजिल्हा बनविण्यात आला. त्यानंतरच्या १५ ते २० वर्षात ब्रिटिशांनी अनेक प्रशासकीय बदल केले आणि १८६९ मध्ये कुलाबा हा स्वतंत्र जिल्हा निर्माण केला. यावेळी कुलाबा या नवीन जिल्ह्यात अलिबाग, रोहा, पेण, माणगाव व महाड हे तालुके समाविष्ट होते.

# इतिहास

रायगड या नावालाच फार मोठा इतिहास आहे. रायगड हे नाव उच्चारल्यावर रायगड जिल्हा व रायगड किल्ला या दोन प्रतिमा नजरेसमोर उभ्या राहतात. रायगड किल्ला ही छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या हिंदवी स्वराज्याची राजधानी म्हणून निवडली होती. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात रायगड हा किल्ला तमाम मराठी माणसाचे स्फूर्तिस्थान बनले आहे. रायगड किल्ल्याचे हे ऐतिहासिक महत्व लक्षात घेऊन १ मे १९८१ रोजी महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री अब्दुल रहेमान अंतुले यांनी कुलाबा जिल्ह्याचे नाव बदलून ‘रायगड’ असे केले.

रायगड जिल्ह्याला इतिहासाचा फार मोठा वारसा लाभलेला आहे. या इतिहासाचे प्राचीन मध्ययुगीन व आधुनिक अशा तीन टप्प्यात वर्गीकरण करण्यात येते.

## ३.३.१. प्राचीन कालखंड :

अरबी समुद्र आणि सहयाद्री पर्वताच्या डोंगररांगा यांच्या दरम्यान असलेली उत्तर दिशेला गुजरातमधील दमणपासून दक्षिण दिशेला गोव्यापर्यंतची अंदाजे ७२० कि. मी. लांबीची व ४५ ते ९० कि. मी. रुंदीची चिंचोळी पट्टी प्राचीन काळापासून कोकण या नावाने ओळखली जाते. या कोकण पट्टीचे दक्षिण कोकण व उत्तर कोकण असे दोन भाग पडतात. पैकी उत्तर कोकणमध्ये सध्याच्या रायगड व ठाणे जिल्ह्याचा समावेश होतो. म्हणजेच उत्तर कोकणचा प्राचीन इतिहास हाच रायगड जिल्ह्याचा प्राचीन इतिहास होय.

अनेक पुरातन ग्रंथांमध्ये कोकण प्रांताविषयीचे उल्लेख सापडतात. कोकणचा अपरांत (पश्चिमेकडील टोक) या नावानेही उल्लेख सापडतो. कालिदासाच्या रघुवंश या नाटकामध्ये अपरांत या नावाचे वर्णन आहे. इ.स.पूर्व ४ थ्या शतकापासून असे उल्लेख नजरेस पडतात. हरिवंश, विश्णू पुराण, बृहत्संहिता, राजतरंगिणी यासारख्या ग्रंथांमध्ये अपरांताचे वर्णन असल्याचे आढळते. विविध शिलालेख तसेच प्लिनी, टॉलेमी, ह्यू-एन-त्संग, इब्न बतुता, अल् बरूनी या परकीय प्रवाशांच्या वृत्तामध्येही कोकण प्रांताचा उल्लेख सापडतो. टॉलेमीने दक्षिण कोकणास ‘आरिका’ व उत्तर कोकणास ‘लारिका’ असे म्हटलेले दिसून येते. इ.स.पूर्व ५ व्या शतकापासून

बॅबिलोन, रोम या संस्कृतीतील लोकांशी कोकणचे व्यापारी संबंध प्रस्थापित झाले होते. चैल, सोपारा, कल्याण यासारखी कोकण किनारपट्टीवरील बंदरे या काळापासून नावारुपास आलेली होती.

रायगड जिल्ह्याच्या प्राचीन इतिहासाकडे डोकावून पाहिल्यास असे दिसून येते की जिल्ह्याच्या हद्दीत असलेल्या घारापुरी बेटावर हातकु-हाडी व रापी सारखी अश्मयुगीन हत्यारे सापडल्याने या भागामध्ये एक ते दीड लाख वर्षापूर्वीपासून मानवी वस्ती नांदत होती हे स्पष्ट होते. जिल्ह्यातील पाचाड येथील गुहांमध्ये गारगोटी सारखी काही उपकरणे सापडली. यावरून या भागात वीस ते चाळीस हजार वर्षा पूर्वीचे मानवाचे अस्तित्व होते हे ही सिध्द होते. रायगड जिल्ह्यात लोहयुगीन संस्कृतीचा उदय नेमका कधी झाला याविषयी निश्चीत माहिती सांगता येत नाही, मात्र जिल्ह्यातील कुडा, चैल, पाले, कोल, ठाणाळे येथे कोरलेल्या बौध्द लेण्यांवरून असे स्पष्ट होते की बौध्द धर्माच्या स्थापनेनंतर या धर्माच्या प्रसारासाठी कोकणच्या प्रदेषात ठिकठिकाणी अशा प्रकारच्या लेण्यांचे कोरीव काम सुरू झाले. सहयाद्री पर्वताच्या डोंगररांगामध्ये पाषाणात कोरलेल्या या लेण्यांवरून आपल्याला लोहयुगीन संस्कृतीची साक्ष पटते. ही लेणी आजही त्या काळातील कारागीरांच्या कौशल्याची साक्ष देतात.

या लेण्यांचे खोदकाम हे अनेक वर्षे चालत असे. हे खोदकाम करणारा पाथरवट हा कारागीरांचा वर्ग तेथेच वास्तव्यास राहत असे. बौध्द भिक्षुंकडून या कारागीरांना मोठ्या प्रमाणात मोबदला मिळत असल्याने त्यांच्या अनेक पिढ्याांकडून हे काम केले गेले. काही शिलालेखांमध्ये कारागीरांनी कोरलेल्या लेण्या दान दिल्याचेही उल्लेख सापडतात. लोहयुगीन संस्कृतीमध्ये लोखंडी हत्यारे व कारागीरांची कला यांचा मोठ्या प्रमाणात प्रसार झाला. त्यासोबत मानवी वस्त्यांसाठी घरांची निर्मिती करताना मातीच्या भाजलेल्या विटा, लोखंडी खिळे, भाजलेली मातीची कौले गावाभोवतीची तटबंदी, दळणाचे जाते, पाटा-वरवंटा, चलनातील नाणी, किनारपट्टीवरील बंदरे, व्यापार लेखनकला इ. गोष्टींचाही ओघाने उदय व विकास होत गेला.

रायगड जिल्ह्याच्या भूप्रदेषावर इतिहास काळातील वेगवेगळया राजसत्तांनी आपले वर्चस्व प्रस्थापित केले होते. या राजसत्तांचा क्रमवार व सुसंगत इतिहास लिखित स्वरूपात सापडत नाही. मात्र जो इतिहास सापडतो त्यात वेगवेगळ्या कालखंडात विविध राजसत्तांचा या जिल्ह्यावर प्रभाव असल्याचे दिसून येते.

## ३.३.२. मध्ययुगीन कालखंड :

सर्वसाधारणपणे १३ व्या शतकापासून भारताच्या मध्ययुगीन इतिहासाला सुरूवात होते. १३ व्या शतकाच्या सुरूवातीलाच दिल्लीमध्ये सुलतानी सत्तेची - स्थापना झाल्याने भारतात प्रथमच मुस्लिम अंमल सुरू झाला. या घटनेने उत्तर भारतामध्ये राजकीय व सामाजिक जीवनात फार मोठया प्रमाणात उलथापालथी सुरू झाल्या. दक्षिण भारतात मात्र अजूनपर्यंत मुस्लिम सत्तेचा शिरकाव झालेला नव्हता. याच शतकाच्या शेवटच्या दशकात उत्तरेकडून दक्षिण भारतात मुस्लिम सत्तेचे आक्रमण सुरू झाले. यावेळी दक्षिण भारतात देवगिरी येथे यादवांची प्रभावी सत्ता होती. अल्लाउद्दिन खिल्जीच्या आक्रमणाने यादव सत्तेचा पराभव झाला आणि दक्षिण भारतातही मुस्लिम सत्तेचा प्रसाराला सुरुवात झाली. सुलतानी सत्तेच्याच काळात विजयनगर, बहामनी, सिद्दी, मराठे तसेच पोर्तुगीज, डच, इंग्रज, फ्रेंच या युरापीय सत्तांनी दक्षिण भारतावर आपला अंमल प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. रायगड जिल्ह्याच्या भूप्रदेशावर या वरील सत्तांनी वेगवेगळ्या कालखंडात वर्चस्व प्रस्थापित केल्याचे दिसून येते. या मध्ययुगीन काळात रायगडच्या राजकीय इतिहासात बरीच राजकीय स्थित्यंतरे घडून आली.

## ३.३.३. मराठी सत्तेचा कालखंड :

मराठी सत्तेच्या उदयापूर्वी रायगड जिल्ह्याच्या विविध भूभागावर विजापूरचा आदिलशहा, अहमदनगरचा निजामशहा, जंजि-याचा सिद्दी, गोव्याचे पोर्तुगीज, मुंबईचे इंग्रज यांचे वर्चस्व होते. जिल्ह्याचा महाड, माणगाव, पोलादपूर हा परिसर आदिलशहाच्या जावळी प्रांतात समाविष्ट होता. त्यावर जावळीचे वतनदार मोरे यांचे वर्चस्व होते. रायगड किल्ला जो पूर्वी रायरी नावाने ओळखला जाई तो देखील जावळीचे वतनदार मोरे यांच्या ताब्यात होता. पश्चिम किनारपट्टीवरील मुरुड, श्रीवर्धन, म्हसळा, रोह्यापर्यंतचा भाग जंजि-याच्या सिद्दीच्या प्रभावाखाली होता.

जिल्ह्याच्या उत्तरेकडील किनारपट्टीवर पनवेल उरण या भागावर मुंबईकर इंग्रजांनी आपले बस्तान बसविले होते. अलिबाग, चैल-रेवदंडा, पेण या भागात अहमदनगरच्या निजामशहाने आपला प्रभाव निर्माण केला होता. गोव्याचे पोर्तुगीजही पश्चिम किनारपट्टीवरील बंदरांवर लक्श केंद्रित करून आपला व्यापार वाढविण्याच्या प्रयत्नात होते. निजामशहाच्या परवानगीने त्यांनी चैल येथे व्यापारी वखार स्थापन केली होती. तर दमण, दीव, वसई ठाणे ही बंदरे आपल्या ताब्यात घेऊन पश्चिम किनारपट्टीवर आपला प्रभाव निर्माण केला होता. जिल्ह्याच्या सागरी हद्दीतील घारापुरी हे बेट १५३४ मध्ये पोर्तुगीजांनी काबीज केले होते. एकूणच शिवाजी महाराजांचा उदय होण्यापूर्वी रायगड जिल्हा हा अनेक सत्ताधीशांनी गिळंकृत केला होता.

छत्रपती शिवाजी महाराजांनी १६४५ मध्ये हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. त्यानंतर पुणे प्रांतात या स्वराज्याचा विस्तार सुरू झाला. रायगड जिल्ह्याशी त्यांचा पहिला संबंध आला तो जावळीच्या मो-याबरोबर झालेल्या संघर्षाच्या निमित्ताने. शिवाजी महाराजांनी मो-यांचा पाडाव करून जावळी प्रांत आपल्या ताब्यात घेतला. (जानेवारी १६५६) या संघर्शात हणमंतराव मोरे मारला गेला व प्रतापराव मोरे विजापूरास पळून गेला. तर यशवंतराव मोरे रायरीच्या किल्ल्यात जाऊन लपून बसला. त्यामुळे रायरी ताब्यात घेण्यासाठी महाराजांनी हैबतराव सिलिमकर यांच्या नेतृत्वाखाली रायरीवर फौज पाठविली. यशवंतराव मो-याने तीन महिने किल्ला लढविला, मात्र पुढे त्याचा नाईलाज होऊन त्याने हैबतरावाशी तहाची बोलणी सुरू केली. महाराजांनी यशवंतराव मोरेला मुख्य गुन्हेगार ठरवून ठार केले तर त्याच्या दोन्ही मुलांना पुण्यामध्ये बंदीवासात ठेवले. अशा प्रकारे मे १६५६ मध्ये रायरीचा किल्ला व त्याच्या आसपासचा आदिलशाही अंमलाखालील प्रदेश स्वराज्यामध्ये समाविष्ट झाला. हा प्रदेश ताब्यात आल्याने त्याचा स्वराज्याच्या उभारणीसाठी फार मोठा फायदा झाला. या भागातील शूर व काटक मावळे स्वराज्याच्या सेनेमध्ये सामील झाले. रायरीचा किल्ला ताब्यात आल्याने त्याची पुनर्बांधणी करून त्याला अभेद्य बनविले. व पुढे हाच किल्ला आपल्या स्वराज्याच्या राजधानीसाठी पक्का केला. या विजयाने मावळ भागातील सरदारांवर महाराजांचा वचक निर्माण झाला. विजापूरच्या आदिलशहाची कोकण प्रांतावरची पकड सैल झाली. यावेळी आर्थिक अडचणीत आलेल्या आदीलशहाने आपला कल्याण प्रांताचा सुभेदार मुल्लाना अहमद

यास खजिना घेऊन बोलाविले तेव्हा शिवाजी महाराजांनी त्यास वाटेतच गाठून त्याच्या जवळचा सर्व खजिना हस्तगत केला.

जावळीच्या विजयानंतर शिवाजी महाराजांनी रायगड जिल्ह्याच्या उत्तर भागावर आपले लक्श केंद्रित केले. कल्याण-भिवंडीकडे मोहीम काढली व त्या भागातील डोंगरी किल्ले जिंकण्यास सुरूवात केली. त्यामुळे सुधागड-पाली, कर्जत, पेण या तालुक्यांतील भूप्रदेषावर मराठी सत्तेचा प्रभाव निर्माण झाला. या भागातील माहुली, तळागड, प्रबळगड, घोसाळगड, चैल-रेवदंडा इ. किल्ले स्वराज्याच्या प्रदेशात समाविष्ट झाले. स्वराज्याच्या सीमेलगत असलेल्या जंजि-याच्या सिद्दीचा येथील स्थानिक लोकांना फार मोठा उपद्रव होत असे. या लोकांनी सिद्दीविरुध्द शिवाजी राजांकडे मदत मागितली. त्यामुळे १६५९ पासूनच शिवाजी राजे व जंजि-याचा सिद्दी यांच्यात संघर्शाला सुरूवात झाली. जंजि-यावर अंकुश ठेवता यावा म्हणून त्यांनी दंडराजापूरी जिंकून त्यावर एक डोंगरी किल्ला बांधला. सिद्दीच्या ताब्यातील अर्ध्याहून अधिक भूभाग महाराजांनी जिंकून तो स्वराज्यात समावष्ट केला. सिद्दी आणि मराठे यांच्या संघर्षात सिद्दीला गोव्याच्या पोर्तुगीजांनी व मुंबईकर इंग्रजांनी मदत केली. या संघर्षाच्या निमित्ताने महाराजांनी सागरी वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या हेतूने आरमाराच्या उभारणीला प्रारंभ केला. कुलाबा किल्ल्याच्या आजुबाजूचा सिद्दीच्या ताब्यातील निम्म्याहून अधिक भाग महाराजांनी आपल्या वर्चस्वाखाली आणला. १६७९ मध्ये शामरावपंत पेशवे यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी सिद्दीला नामशेष करण्यासाठी मोठी फौज पाठविली मात्र या मोहिमेत मराठ्यांना पराभव पत्करावा लागला.

शिवाजी महाराजांनी युरोपीय सत्तांचा धोका ओळखला होता. त्यामुळे या सत्तांना शह देण्यासाठी भक्कम आरमाराची निर्मिती सुरू केली. कुलाबा किल्ला हे आरमाराचे प्रमुख केंद्र बनविले. गोव्याच्या पोर्तुगीजांना शह देण्यासाठी सिंधुदुर्ग, जंजि-याच्या सिद्दीला शह देण्यासाठी पद्म, तर मुंबईकर इंग्रजांना शह देण्यासाठी खांदेरी हे जलदुर्ग उभारले. १६६० च्या दरम्यान त्यांनी कल्याण, भिवंडी व पेण येथे २० गुराबा बांधावयास घेतल्या त्यांच्या आरमाराची धुरा मायनाक भंडारी, दौलतखान, वेंटाजी सरंगी उर्फ दर्यासारंग यांच्याकडे होती. १६६९ च्या खांदेरीच्या लढाईच्या वेळी शिवाजी महाराजांच्या आरमाराची इंग्रजांनीही प्रशंसा केली होती. तसेच शिवाजी

महाराजांचे भूगोल विषयक ज्ञान व दुर्गबांधणीच्या कौशल्याचा १६७२-७४ मध्ये भारत भेटीवर आलेल्या ॲबे कॅरे या फ्रेंच प्रवाशाने उल्लेख केला आहे. कावेरी नदीपासून सिंधू नदीपर्यंतचा प्रदेश ताब्यात घेण्याचे त्यांचे स्वप्न होते असेही ॲबे कॅरे याने नमुद केले आहे.

शिवाजी महाराजांनी रायगड जिल्ह्याचा बहुतांशी भाग किंबहुना संपूर्ण कोकण किनारपट्टी ताब्यात घेतल्यानंतर स्वराज्य संरक्शणासाठी या प्रदेशाची उपयुक्तता जाणली आणि याच भूप्रदेषातील रायगड हा अभेद्य व दुर्गम असा किल्ला राजधानीसाठी निवडला. १६६४ च्या सुरतच्या लुटीतून त्यांनी रायगड किल्ल्याची मजबूत बांधणी केली. पुढे ६ जून १६७४ रोजी त्यांनी रायगडावर राज्याभिषेक करून घेतला. राज्याभिषेकाच्या विधीमुळे शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याला एक स्वतंत्र व घटनात्मक अधिष्ठन प्राप्त झाले. त्यामुळे इतर स्वकीय व परकीय सत्तांमध्येही या मराठी सत्तेबद्दल वचक निर्माण झाला. यावेळेपर्यंत रायगड जिल्ह्यातील बराचसा भाग मराठ्याच्या वर्चस्वाखाली आला होता.

१६८० मध्ये शिवाजी महाराजांचा मृत्यू झाल्यानंतर स्वराज्याची सूत्रे संभाजी महाराजांकडे आली. त्यांच्या कारकीर्दीतही रायगड जिल्ह्याचा बहुतांशी भूप्रदेश हा मराठ्यांच्याच वर्चस्वाखाली होता. रायगड जिल्ह्याच्या बाजूला असलेल्या जंजि-याच्या सिद्दीला नमविण्यासाठी त्यांनी जंजि-यावर जोरदार मोहीम उघडली होती. तसेच पोर्तुगीजांना नमविण्यासाठी त्यांनी चैल-रेवदंड्यालाही वेढा घातला होता. त्याचवेळी दिल्लीचा मुघल बादशहा औरंगजेब सर्व सामर्थ्यानिशी दक्षिणेकडे उतरल्याने ही मोहीम त्यांना अर्धवट सोडावी लागली व चैलचा वेढाही उठवावा लागला होता. (डिसेंबर १६८३) १६८९ मध्ये मुघल-मराठा संघर्षात संभाजी राजे औरंगजेबाच्या हाती सापडल्याने रायगड किल्ल्यासह जिल्ह्याचा बहुतांशी भाग तसेच किनारपट्टीवरील प्रमुख बंदरांचा ताबा शत्रूच्या अर्थातच मुघलांच्या वर्चस्वाखाली आला.

## ३.३.४. आधुनिक कालखंड -

## रायगडाचा पाडाव व जिल्ह्यात ब्रिटिशाचा शिरकाव:-

मराठी सत्तेबरोबर झालेल्या दीर्घकालीन संघर्षात अखेर इंग्रजांनी बाजी मारली आणि मराठ्यांना पराभव पत्करावा लागला. १ जानेवारी १८१८ रोजी पेशवा दुस-या बाजीरावाची सेना पराभूत झाली. त्यानंतर पेशव्यांचा सेनापती बापू गोखले आणि इंग्रज सेनाधिकारी जॉन माल्कम यांच्यात पंढरपूर जवळ आष्टी येथे घनघोर लढाई झाली. या लढाईत बापू गोखले मारला गेला. आता पेशवा बाजीरावाला कोणाचाही आधार उरला नाही. तो उत्तरेकडे पळत असताना नर्मदेच्या परिसरात त्याला इंग्रज सैन्याने घेरले. शेवटी बाजीराव स्वतः ३ जून १८१८ रोजी माल्कमच्या स्वाधीन झाला. इंग्रजांनी त्याला उत्तरेकडे कानपूर जवळ ब्रम्हावर्त (बिठूर) येथे स्थानबध्द केले. पुणे ही पेशव्यांची राजधानी ब्रिटिषांच्या ताब्यात गेली. शनिवारवाड्यावर ब्रिटिशाचा युनियन जॅक फडकू लागला. मात्र मराठी सत्तेचा मानबिंदू असलेला रायगड अजूनही मराठ्यांच्या ताब्यात होता. त्यामुळे मराठी सत्तेचे उरलेसुरले अस्तित्व नष्ट करण्याच्या हेतूने ब्रिटिशांनी रायगडाकडे कूच केले. कर्नल पॉथर याच्या नेतृत्वाखाली मोहीम उघडण्यात आली.

१ मे १८१८ रोजी पॉथरने रायगडावर हल्ला चढविला. यावेळी किल्ल्याच्या रक्षणाची जबाबदारी किल्लेदार शेख अबुद फतेखान याच्याकडे होती. आपली सारी शक्ती पणाला लावून फतेखान इंग्रजांस मुकाबला करीत होता. किल्ल्यावरील भगव्या झेंड्याचं रक्षण करण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होता. त्याच्या सोबतीला असणारे मराठी सैनिक प्राणपणाने झुंज देत होते. यावेळी पेशवा दुस-या बाजीरावाच्या पत्नी वाराणसीबाई रायगड किल्ल्यावर होत्या. दहा दिवस इंग्रज आणि मराठे यांच्यात तुंबळ लढाई सुरू होती. रायगडाला वेढा पडल्याची बातमी कांगोरीगडावर व प्रतापगडावर पोहोचली. यावेळी रायगडाच्या रक्षणासाठी पोलादपूर येथून सैन्याची एक तुकडी रवाना झाली. त्यात मालुसरे, गोळे, दरेकर, बांदल यांचा समावेश होता. कर्नल पॉथर पोटल्याच्या डोंगराकडून आपला मोर्चा लागू करणार होता. त्याच्या पिछाडीकडून मराठी सैन्याने हल्ला करण्यासाठी आघाडी उघडली. मात्र इंग्रज सेनाधिकारी जनरल क्रॉसवी याने या तुकडीला अडविले. सावित्री व

काळ नदीच्या संगमावर त्यांच्यात लढाई झाली. या तुकडीचा क्ऱॅसवी याने पराभव केला.

अखेर १० मे १८१८ रोजी कर्नल प्रॅाथर ने दारूगोळ्याचा प्रचंड स्फोट घडवून आणला. या स्फोटाने रायगड हादरला. मे महिन्याच्या तीव्र उन्हाळ्यात अंगाची लाही लाही होत असताना गडाखालून तोफांचा आणि बंदुकांचा भडिमार सुरू होता. त्यात रायगड किल्ला पूर्णपणे होरपळून गेला. मराठ्यांनी हार पत्करली आणि रायगड इंग्रजांच्या स्वाधीन झाला. कर्नल प्रॅाथर गडावर आला. त्याच्या हल्ल्याने रायगडाची अवस्था अत्यंत भयावह झाली होती. गडावरील सर्व साधनसामग्री जळून बेचिराख झाली होती. पेशवा बाजीरावाच्या पत्नी वाराणसीबाई एका खुरट्या झुडपाच्या आडोशाला खिन्नपणे उभ्या होत्या. कर्नल प्रॅाथर त्यांच्याजवळ आला. तो त्यांच्याशी अतिशय आदराने वागला. पुढे प्रॅाथर त्यांना अत्यंत सन्मानाने मेण्यात बसवून पुण्याकडे रवाना केले. त्यानंतर त्यांची रवानगी बिठूर येथे स्थानबध्द असलेल्या बाजीरावाकडे केली. १० मे रोजी इंग्रजांनी रायगडाचा ताबा आपल्याकडे घेतला. ज्या रायगडाला छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या हिंदवी स्वराज्याची राजधानी बनविले, ज्या रायगडाने शिवकाळात वैभवाचे सारे साज आपल्या अंगाखांद्यावर खेळविले, त्या रायगडाची इंग्रजांनी पूर्णपणे धुळधाण केली. रायगड ताब्यात आल्याने आजुबाजूच्या परिसरावर इंग्रजांचे नियंत्रण प्रस्थापित झाले.

**३.३.५. कुलाबा संस्थानाचा शेवट -** मराठ्यांच्या इतिहासात नावलौकीक प्राप्त झालेले कुलाबा (अलिबाग) येथील आंग्रे हे एक महत्वाचे घराणे होते. कान्होजी आंग्रे हे या घराण्यातील कर्तबगार पुरूष व या घराण्याचे संस्थापक होते. त्यांचे वडील तुकोजी आंग्रे हे शिवाजी महाराजांच्या पदरी होते. छत्रपती राजाराम यांच्या कारकीर्दीत आंग्रे घराणे प्रसिध्दीच्या झोतात आले. कुलाबा हा अलिबाग जवळील किल्ला आंग्रे घराण्याचे मुख्य ठाणे असून पश्चिम किनारपट्टीवर त्यांची हुकुमत चालत असे. त्यांचा पराक्रम व कर्तबगारी पाहून राजाराम महाराजांनी त्यांना मराठी आरमाराचे प्रमुख नेमून ‘सरखेल’ ही मानाची पदवी दिली होती. कान्होजींनी मराठ्यांचे आरमार कार्यक्षम बनवून पश्चिम किनारपट्टीवर इंग्रज, फ्रेंच, डच, पोर्तुगीज, सिद्दी या सत्तांवर वचक निर्माण केला. कान्होजींच्या मृत्यूनंतर या घराण्यात होऊन गेलेल्या वारसांचा तपशील वर आला आहे.

पेशवा दुसरा बाजीराव याच्या कारकीर्दीत १८१७ मध्ये मानाजी आंग्रे दुसरा याच्या मृत्यूनंतर रघुजी आंग्रे दुसरा हा सरखेल पदावर आला. हा कालखंड म्हणजे मराठी सत्तेची (पेशवाईची) अखेर होती. दुस-याच वर्षी ब्रिटिशांनी मराठी सत्तेचा शेवट केला. रघुजी आंग्रे यांनी मात्र कुलाबा संस्थानाचा कारभार सुरळितपणे सुरू ठेवला. संस्थानात शंतता व सुव्यवस्था निर्माण केली. परंतु इंग्रजांचा संस्थानी कारभारातील हस्तक्षेप वाढत जाऊन १८२२ मध्ये रघुजी आंग्रे व इंग्रज यांच्यात तह घडून आला. या तहामुळे रघुजी आंग्रे व पर्यायाने कुलाबा संस्थानावर अनेक बंधने लादण्यात आली.

रघुजी आंग्रे यांचा २६ डिसेंबर १८३८ मध्ये मृत्यू झाला. त्याला असलेल्या दोन मुलांपैकी एक मुलगा रघुजीच्या मृत्यू अगोदरच मरण पावला होता तर दुसरा मुलगा त्याच्या मृत्यूनंतर जन्माला आला. या अल्पवयीन मुलास कान्होजी दुसरा या नावाने १८३९ मध्ये सरखेलपदी विराजमान करण्यात आले. ६ फेब्रुवारी १८३९ रोजी इंग्रजांनी त्यास मान्यता दिली. मात्र २१ मार्च १८३९ रोजी त्याचा मृत्यू झाला.
कान्होजी दुसरा हा अल्पवयातच वारल्याने आंग्र्यांच्या गादीला वारसच उरला नाही. त्यामुळे ब्रिटिश सरकारने कुलाबा हे संस्थानच बरखास्त केले. रघुजीच्या पत्नीने गादीला वारस म्हणून दत्तक घेण्याचा प्रयत्न चालविला. मात्र कान्होजी दुसरा याचा वारस नसल्याने ३० डिसेंबर रोजी कोर्ट ऑफ डायरेक्टर्सने पाठविलेल्या खलित्यानुसार सरकारने कुलाबा संस्थान पूर्णपणे खालसा केले. इंग्रज अधिकारी जे. एम. डेव्हिस याने कुलाबा संस्थानाचा दिवाण विनायक परशुराम याच्याकडून सर्व सुत्रे आपल्या हाती घेतली. त्याची कुलाब्याचा पोलिटिकल सुपरिटेन्डेंट म्हणून नियुक्ती करण्यात आली आणि कुलाबा हे संस्थान ब्रिटिश साम्राज्यात विलीन होऊन त्यावर ब्रिटिश नियंत्रण प्रस्थापित झाले.

## प्रकरण चार :

## किल्ले रायगड व किल्ले लिंगाणा :

### ४.१. किल्ले रायगड

**४.१.१ भौगोलिक स्थान :** किल्ले रायगड हा महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील सह्याद्रीच्या पर्वतरांगांत असून समुद्रसपाटीपासून सुमारे ८२० मीटर (२७०० फूट) उंचीवर आहे. मराठी साम्राज्याच्या इतिहासामध्ये त्याची एक खास ओळख आहे. छत्रपती शिवाजीराजांनी रायगडचे स्थान आणि महत्त्व पाहून [इ.स.चे १६ वे शतक|१६ व्या शतकात] याला आपल्या राज्याची राजधानी बनविली. शिवराज्याभिषेक याच ठिकाणी झाला. इंग्रजांनी गड कब्जात घेतल्यानंतर लुटून त्याची नासधूस केली. सदर किल्ला हा महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व विभागाचे संरक्षित स्मारक आहे.प्राचीन नाव 'रायरी' हे होते. युरोपचे लोक त्यास 'पूर्वेकडील जिब्राल्टर' असे म्हणत असत. जिब्राल्टरचे ठाणे जितके अजिंक्य तितकाच रायगड अजिंक्य व दुर्गम. पाचशे वर्षांपूर्वी त्यास गडाचे स्वरूप नव्हते व तो नुसता एक डोंगर होता, तेव्हा त्यास 'रासिवटा' व 'तणस' अशी दोन नावे होती. त्याचा आकार, उंची व सभोवतालच्या दऱ्या यावरून त्यास 'नंदादीप' असेही नाव पडले. निजामशाहीत रायगडाचा उपयोग कैदी ठेवण्यापुरता होई. मोऱ्यांचा प्रमुख यशवंतराव मोरे जावळीहून पळून रायगडावर जाऊन राहिला तर प्रतापराव मोरे विजापुरास पळाला. महाराजांनी ६ एप्रिल १६५६ रोजी रायरीस म्हणजेच रायगडास वेढा घातला व मे महिन्यात रायरी महाराजांच्या ताब्यात आली. तेथे असताना, कल्याणचा सुभेदार मुल्ला अहमद खजिना घेऊन विजापूरकडे निघाल्याची बातमी महाराजांना समजली. त्यांनी तो खजिना लुटून रायगडावर आणला व त्या खजिन्याचा उपयोग गडाच्या बांधकामासाठी केला. रायगडाचा माथा राजधानी बनवण्यास सोयीचा व पुरेसा आहे. शत्रूला अवघड वाटणाऱ्या प्रदेशातले ते अधिक अवघड ठिकाण आहे. सागरी दळणवळणासही हे ठिकाण जवळ आहे. म्हणून महाराजांनी राजधानीसाठी या गडाची निवड केली. रायगड किल्याचे पूर्वीचे नाव जम्बुदीप असे होते.याच

दुर्गदुर्गेश्वराला १५ विविध नावांनी संबोधिले गेले आहे. :- १.रायगड २.रायरी ३.इस्लामगड ४.नंदादीप ५.जंबुद्वीप ६.तणस ७.राशिवटा ८.बदेनूर ९.रायगिरी १०.राजगिरी ११.भिवगड १२.रेड्डी १३.शिवलंका १४.राहीर आणि १५.पूर्वेकडील जिब्राल्टर.'देवगिरीच्याहून दशगुणी, दीड गाव उंच, प्रशस्त जागा. पर्जन्यकाळी कड्यावर गवत उगवत नाहि. उभ्या कड्यावर पाखरू उतरावयास जागा नाहि' हे बघून महाराज खुशीने म्हणाले... 'तख्तास जागा हाच गड करावा'. छत्रपती शिवाजी महाराजांच्या या शब्दाचा उल्लेख बखरीत आहे. रायगडाचे स्थान लक्षात घेऊन या किल्यावरच राजधानी बसवण्याचे महाराजांनी निश्चित केले. रायगडाचे जुने नाव रायरी, गडाचा विस्तार प्रचंड असून समुद्रसपाटीपासून किल्याची उंची २९०० फूट आहे. गडाला सुमारे १४३५ पायऱ्या आहेत. गडाच्या पश्चिमेकडे हिरकणीचा बुरूज, उत्तरेकडच टकमक टोक, श्री शिरकाई मंदिर आणि मध्यभागी असलेला महाराजांचा पुतळा हे मुख्य आकर्षण आहे.

शिर्के पाचव्या शतकापासून रायगडाचे स्वामी होते. याची आठवण देणारी गडस्वामिनी श्री शिरकाई मंदिर गडावर आहे. लोकमान्य टिळकांच्या काळात मावळंकर नावाच्या इंजिनिअरने हे मंदिर बांधले आहे. ते श्री शिरकाईचे मूळ मंदिर नाही. मूर्ती मात्र प्राचीन आहे. मूळ शिरकाई मंदिर राजवाड्यास लागून डावीकडे होळी माळावर होते. तेथे मूळ देवळाचा चबुतरा अजूनही आहे. ब्रिटिश काळापासून तेथे श्री शिरकाईचा घरटा हा नामफलक होता.

## ४.१.२ शिवराज्याभिषेक

शिवराज्याभिषेक हा रायगडाने अनुभवलेला सर्वश्रेष्ठ प्रसंग आहे. महाराजांचा राज्याभिषेक म्हणजे, महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या इतिहासातील एक लक्षणीय घटना आहे. १९ मे १६७४ रोजी राज्याभिषेकाच्या विधी पूर्वी महाराजांनी प्रतापगडाच्या भवानीचे दर्शन घेतले. तीन मण सोन्याचे म्हणजेच ५६ हजार किंमतीचे छत्र देवीला अर्पण केले. गडावरील राज सभेत ६ जून १६७४, ज्येष्ठ शुद्ध १३ शके १५९६, शनिवार या दिवशी राज्याभिषेक साजरा झाला. २४ सप्टेंबर १६७४, ललिता पंचमी आश्विन शुद्ध ५, आनंद संवत्सर शके १५९६ या दिवशी तांत्रिक पद्धतीने राजांनी स्वतःला आणखी एक राज्याभिषेक करून घेतला.

या मागचा खरा हेतू हा जास्तीत जास्त लोकांना समाधान वाटावे हा होता. हा राज्याभिषेक निश्चलपुरी गोसावी याच्या हस्ते पार पडला.

### ४.१.३. गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :

#### ४.१.३.१. पाचाडचा जिजाबाईंचा वाडा :

उतारवयात जिजाबाईंना गडावरची थंड हवा, वारा मानवत नसे, म्हणून महाराजांनी त्यांचासाठी पाचाडजवळच एक वाडा बांधून दिला. तोच हा मासाहेबांचा राहता वाडा. वाड्याची व्यवस्था ठेवण्यासाठी काही अधिकारी तसेच शिपायांची व्यवस्थाही महाराजांनी केली होती. पायऱ्यांची एक उत्तम विहीर, तसेच जिजाबाईंना बसण्यासाठी केलेले दगडी आसन बघण्यासारखे आहे. यास 'तक्क्याची विहीर' असेही म्हणतात.

#### ४.१.३.२. खुबलढा बुरूज :

गड चढू लागले म्हणजे एक बुरुजाचे ठिकाण दिसते, तोच हा सुप्रसिद्ध खुबलढा बुरूज. बुरुजा शेजारी एक दरवाजा होता, त्यास 'चित् दरवाजा' म्हणत पण हा दरवाजा आता पूर्णपणे उध्वस्त झाला आहे.

#### ४.१.३.३. नाना दरवाजा :

या दरवाजास 'नाणे दरवाजा' असेही म्हणत. नाना दरवाजा याचाच अर्थ लहान दरवाजा. इ.स. १६७४ च्या मे महिन्यात राज्याभिषेकाचा निमित्ताने इंग्रजांचा वकील हेन्री ऑक्झेंडन याच दरवाजाने आला होता. या दरवाजास दोन कमानी आहेत. दरवाजाचा आतील बाजूस पहारेकऱ्यांसाठी दोन लहान खोल्या आहेत. त्यांस 'देवडा' म्हणतात. दरवाजास अडसर घालण्यासाठी खोबणी दिसतात.

#### ४.१.३.४. मदारमोर्चा किंवा मशीदमोर्चा :

चित् दरवाजाने गेल्यावर नागमोडी वळणे घेत गेलेल्या रस्त्याने पुढे गेल्यावर एक सपाटी लागते. या मोकळ्या जागेत टोकाशी दोन पडक्या इमारती दिसतात. त्यापैकी एक पहारेकऱ्यांची जागा असून दुसरे धान्याचे कोठार आहे. येथे मदनशहा

नावाचा साधूचे थडगे आहे. तेथे एक प्रचंड तोफही दिसते. येथून पुढे गेल्यावर खडकात खोदलेल्या तीन गुहा दिसतात.

### ३.१.३.५. **महादरवाजा** :

महादरवाजाचा बाहेरील अंगास वर दोन्ही बाजूस दोन सुंदर कमळाकृती कोरल्या आहेत दरवाजावर असणाऱ्या या दोन कमळांचा अर्थ म्हणजे किल्ल्याचा आत 'श्री आणि सरस्वती' नांदत आहे. 'श्री आणि सरस्वती' म्हणजेच 'विद्या व लक्ष्मी' होय. महादरवाजाला दोन भव्य बुरूज असून एक ७५ फूट तर दुसरा ६५ फूट उंचं आहे. तटबंदीमध्ये जी उतरती भोके ठेवलेली असतात त्यास 'जंग्या' म्हणतात. शत्रूवर मारा करण्यासाठी ही भोके ठेवलेली असतात. बुरुजांमधील दरवाजा हा वायव्य दिशेस तोंड करून उभा आहे. महादरवाजातून आत आल्यावर पहारेकऱ्यांचा देवड्या दिसतात तसेच संरक्षकांसाठी केलेल्या राहण्याचा खोल्या दिसतात. महादरवाजापासून उजवीकडे टकमक टोकापर्यंत तर डावीकडे हिरकणी टोकापर्यंत तटबंदी बांधलेली आहे.

### ४.१.३.६. **चोरदिंडी** :

महादरवाजापासून उजवीकडे टकमक टोकापर्यंत जी तटबंदी जाते, त्यावरून चालत गेल्यास जिथे ही तटबंदी संपते, त्याच्या थोडे अलीकडे बुरुजात ही चोरदिंडी बांधलेली आहे. बुरुजाचा आतून दरवाजापर्यंत येण्यासाठी पायऱ्या आहेत.

### ४.१.३.७. **हत्ती तलाव** :

महादरवाजातून थोडे पुढे आल्यावर जो तलाव दिसतो तो हत्ती तलाव. गजशाळेतून येणाऱ्या हत्तींच्या स्नानासाठी आणि पिण्यासाठी या तलावाचा उपयोग होत होता.

### ४.१.३.८. **गंगासागर तलाव** :

हत्तीतलावापासून जवळच रायगड जिल्हा परिषदेचा धर्मशाळेचा इमारती दिसतात. धर्मशाळेपासून दक्षिणेकडे अंदाजे ५० -६० पावले चालत गेल्यास जो तलाव लागतो तो गंगासागर तलाव. महाराजांचा राज्याभिषेकानंतर सप्तसागर व महानांची आणलेली तीर्थे याच तलावात टाकली गेली. म्हणूनच याचे गंगीसागर

असे नाव पडले. शिवाजी महाराजांचा काळात शिबंदीसाठी याचे पाणी वापरण्यात येई.

### ४.१.३.९. स्तंभ :

गंगासागराचा दक्षिणेस दोन उंच मनोरे दिसतात. त्यासच स्तंभ म्हणतात. जगदीश्वराचा शिलालेखामध्ये ज्या स्तंभांचा उल्लेख केला आहे, ते हेच असावेत. ते पूर्वी पाच मजले होते असे म्हणतात. ते द्वादश कोनी असून बांधकामात नक्षीकाम आढळते.

### ४.१.३.१०. मेणा दरवाजा :

पालखी दरवाजाने वर प्रवेश केला की, चढउतार असलेला एक सरळ मार्ग आपल्याला मेणा दरवाजापर्यंत घेऊन जातो. उजव्या हातास जे सात अवशेष दिसतात ते आहेत राण्यांचे महाल. मेणा दरवाजातून बालेकिल्ल्यावर प्रवेश करता येतो.

### ४.१.३.११. पालखी दरवाजा :

स्तंभांचा पश्चिमेस भिंत असलेल्या भागातून ३१ पायऱ्या बांधलेल्या दिसतात. त्या चढून गेल्यावर जो दरवाजा लागतो तो पालखी दरवाजा. या दरवाजातून बालेकिल्ल्यात प्रवेश करता येतो.

### ४.१.३.१२. राजभवन :

राणीवशाचा समोर डाव्या हातास दासदासींचा मकानांचे अवशेष दिसतात या अवशेषांचा मागे दुसरी जी समांतर भिंत आहे त्या भिंतीचा मध्यभागी जो दरवाजा आहे तेथून बालेकिल्ल्याचा अंतर्भागात प्रवेश केला की जो प्रशस्त चौथरा लागतो तेच हे महाराजांचे राजभवन. राजभवनाचा चौथारा ८६ फूट लांब व ३३ फूट रुंद आहे. १३. रत्नशाळा : राजप्रासादाजवळील स्तंभांच्या पूर्वेकडे असलेल्या मोकळ्या जागेत एक तळघर आहे, तीच ही रत्नशाळा. हा खलबतखाना म्हणजेच गुप्त बोलणी करण्यासाठी केलेली खोली असावी असेही म्हणतात.

### ४.१.३.१३. राजसभा :

महाराजांचा राज्याभिषेक जेथे झाला, तीच ही राजसभा.

राजसभा २२० फूट लांब व १२४ फूट रुंद आहे. येथेच पूर्वेकडे तोंड केलेली सिंहासनाची जागा आहे. येथे बत्तीस मणांचे सोन्याचे सिंहासन होते. सभासद बखर म्हणते, 'तख्त सुवर्णाचे बत्तीस मणांचे सिद्ध करवले. नवरत्ने अमोलिक जितकी कोशात होती, त्यामध्ये शोध करून मोठी मोलाची रत्ने जडाव केली.'

### **४.१.३.१४.. नगारखाना** :

सिंहासनाचा समोर जे भव्य प्रवेशद्वार दिसते तोच हा नगारखाना. हे बालेकिल्ल्याचे मुख्य प्रवेशद्वार आहे. नगारखान्यातून पायऱ्या चढून वर गेले की माणूस किल्ल्यावरील सर्वाधिक उंचीवर असतो.

### **४.१.३.१५ शिरकाई देऊळ** :

महाराजांचा पुतळ्याचा डाव्या बाजूस जे छोटे देऊळ दिसते ते शिरकाईचे देऊळ. शिरकाई ही गडावरील मुख्य देवता. शिर्के पाचव्या शतकापासून रायगडाचे स्वामी होते. याची आठवण देणारी गडस्वमिनी शिरकाई हिचे मंदिर गडावर आहे. लोकमान्य टिळकांचा काळात मावळकर नावाचा इंजिनिअराने हे मंदिर बांधले आहे. ते शिरकाईचे मूळ मंदिर नाही. मूर्ती मात्र प्राचीन आहे. मूळ शिरकाई मंदिर राजवाड्यास लागून डावीकडे होळी माळावर होते. तेथे मूळ देवळाचा चबुतरा अजूनही आहे. ब्रिटिश काळात तेथे शिरकाईचा घरटा हा नामफलक होता.

### **४.१.३.१६. बाजारपेठ** :

नगारखान्याकडून डावीकडे उतरून आले की, समोर जी मोकळी जागा दिसते तो 'होळीचा माळ'. तेथेच आता शिवछत्रपतींचा भव्य पुतळा बसवलेला आहे. पुतळ्यासमोर जे दोन रांगांमध्ये भव्य अवशेष दिसतात तीच शिवाजी महाराजांचा काळातील बाजारपेठ. पेठेचा दोन रांगात प्रत्येकी २२ दुकाने आहेत. दोन रांगांमधून जवळजवळ चाळीस फूट रुंदीचा रस्ता आहे.हे बाजार पेठ आजही हुबेहुब जसेचा तसेच आहे.

### **४.१.३.१७. कुशावर्त तलाव** :

होळीचा माळ डाव्या हातास सोडून उजवीकडील वाट कुशावर्त तलावाकडे जाते. तलावाजवळ महादेवाचे छोटेसे देऊळ दिसते. देवळासमोर फुटलेल्या अवस्थेतला नंदी दिसतो.

## ४.१.३.१८. जगदीश्वर मंदिर :

बाजारपेठेचा खालचा बाजूस पूर्वेकडील उतारावर ब्राह्मणवस्ती, ब्राह्मणतळे वगैरे अवशेष दिसतात. तेथूनच समोर जे भव्य मंदिर दिसते तेच महादेवाचे म्हणजे जगदीश्वराचे मंदिर. मंदिरासमोर नंदीची भव्य आणि सुबक मूर्ती आहे. पण सध्या ही मूर्ती भग्नावस्थेत आहे. मंदिरात प्रवेश केला की भव्य सभामंडप लागतो. मंडपाच्या मध्यभागी भव्य कासव आहे. गाभाऱ्याचा भिंतीस हनुमंताची भव्य मूर्ती दिसते. मंदिराचा प्रवेशद्वाराचा पायऱ्यांचा खाली एक लहानसा शिलालेख दिसतो. तो पुढीलप्रमाणे, 'सेवेचे ठायी तत्पर हिरोजी इंदुलकर' या दरवाजाचा उजव्या बाजूस भिंतीवर एक सुंदर शिलालेख दिसतो तो पुढीलप्रमाणे - श्री गणपतये नमः। प्रासादो जगदीश्वरस्य जगतामानंददोनुज्ञया श्रीमच्छत्रपतेः शिवस्यनृपतेः सिंहासने तिष्ठतः। शाके षण्णवबाणभूमिगणनादानन्दसंवत्सरे ज्योतीराजमुहूर्तकिर्तीमहिते शुक्लेशसापै तिथौ ॥१॥ वापीकूपडागराजिरुचिरं रम्यं वनं वीतिकौ स्तभेः कुंभिगृहे नरेन्द्रसदनैरभ्रंलिहे मीहिते । श्रीमद्रायगिरौ गिरामविषये हीराजिना निर्मितो यावच्चन्द्रदिवाकरौ विलसतस्तावत्समुज्जंभते ॥२॥ याचा थोडक्यात अर्थ पुढीलप्रमाणे -'सर्व जगाला आनंददायी असा हा जगदीश्वराचा प्रासाद श्रीमद् छत्रपती शिवाजी राजांचा आज्ञेने शके १५९६ मध्ये आनंदनाम संवत्सर चालू असताना सुमुहूर्तावर निर्माण केला. या रायगडावर हिरोजी नावाचा शिल्पकाराने विहिरी, तळी, बागा, रस्ते, स्तंभ, गजशाळा, राजगृहे अशांची उभारणी केली आहे. ती चंद्रसूर्य असेतोवर खुशाल नांदो.'

## ४.१.३.१९. महाराजांची समाधी :

मंदिराचा पूर्वदरवाजापासून थोडा अंतरावर जो अष्टकोनी चौथरा दिसतो तीच महाराजांची समाधी. सभासद बखर म्हणते, 'क्षत्रियकुलावतंस श्रीमन्महाराजाधिराजशिवाजी महाराज छत्रपती यांचा काल शके १६०२चैत्र (शुद्ध १५ (इसवी१६८०)या दिवशी रायगड येथे झाला. देहाचे सार्थक त्याणी बांधिलेला जगदीश्वराचा जो प्रासाद त्याचा महाद्वाराचा बाहेर दक्षणभागी केले. तेथे काळ्या दगडाचा चिऱ्याचे सुमारे छातीभर उंचीचे अष्टकोनी जोते बांधिले असून वरून फरसबंदी केलेली आहे. फरसबंदीचा खाली पोकळी आहे, तीत महाराजांचा

अवशिष्टांश रक्षामिश्र मृत्तिकारूपाने सापडतो.' दहनभूमी पलीकडे भग्न इमारतींचा अवशेषांची एक रांग आहे, ते शिबंदीचे निवासस्थान असावे. त्याचा पलीकडे सदर वस्तीपासून विलग असा एक घराचा चौथरा दिसतो. हे घर **इ.स. १६७४ मध्ये** इंग्रज वकील हेनरी ऑक्झेंडन यास राहावयास दिले होते. महाराजांचा समाधीचा पूर्वेकडे भवानी टोक आहे तर उजवीकडे दारूची कोठारे, बारा टाकी दिसतात.

### ४.१.३.२०. वाघदरवाजा :

कुशावर्त तलावाजवळून घळीने उतरत वाघ दरवाजाकडे जाता येते. आज्ञापत्रात लिहिले आहे की, 'किल्ल्यास एक दरवाजा थोर आयब आहे, यांकरीता गड पाहून एक दोन - तीन दरवाजे, तशाच चोरदिंडा करून ठेवाव्या. त्यामध्ये हमेशा राबत्यास पाहिजे तितक्या ठेवून वरकड दरवाजे व दिंडा चिणून टाकाव्या.' हे दूरदर्शीपणाचे धोरण ठेऊनच महाराजांनी महादरवाजाशिवाय हा दरवाजा बांधून घेतला. या दरवाजाने वर येणे जवळजवळ अशक्यच असले तरी दोर लावून खाली उतरू शकतो. पुढे राजाराम महाराज व त्यांची मंडळी झुल्फिरखानाचा वेढा फोडून याच दरवाजाने निसटली होती.

### ४.१.३.२१. टकमक टोक :

बाजारपेठेचा समोरील टेपावरून खाली उतरून टकमक टोकाकडे जाता येते. तेथेच एका दारूचा कोठाराचे अवशेष दिसतात. जसजसे टोकाकडे जावे तसतसा रस्ता निमुळता होत जातो. उजव्या हाताला सरळ तुटलेला २६०० फूट खोल कडा आहे. टोकावर वारा प्रचंड असतो व जागाही कमी असल्यामुळे गोंधळ न करता सावधानता बाळगावी लागते.आधीपासुनच शिवराज्यकाळात या ठिकाणावरून गुन्हेगारांचा कडेलोट केला जाई.

### ४.१.३.२२. हिरकणी टोक :

गंगासागराचा उजवीकडे पश्चिमेस जी चिंचोळी वाट जाते ती हिरकणी टोकाकडे जाते. हिरकणी टोकाशी संबंधित हिरकणी गवळणीची एक कथा सांगितली जाते. या बुरुजावर काही तोफाही ठेवलेल्या दिसतात. बुरुजावर उभे राहिले तर डाव्या हाताला गांधारीचे खोरे, उजव्या बाजूला काळ नदीचे खोरे दिसते. तसेच इथून

पाचाड, खुबलढा बुरूज, मशीद मोर्चा ही ठिकाणे तोफेचा माऱ्यात आहेत. त्यामुळे युद्धशास्त्राचा तसेच लढाऊ दृष्टीने ही खूप महत्त्वाची आणि मोक्याची जागा आहे.

## ४.२. किल्ले लिंगाणा

### ४.२.१. भोगोलिक स्थान :

लिंगाणा हा रायगड किल्ल्याचा उपदुर्ग आहे. माणगड, सोनगड, महिन्द्रगड, लिंगाणा, कोकणदिवा हे किल्ले रायगडाकडे जाणाऱ्या घाटवाटांवर पहारे देतात. कावळ्या, बोचेघोळ, निसनी, बोराटा, सिंगापूर, फडताड, शेवत्या, मढ्या अशी घाटांची नावे आहेत. या वाटांवरून सह्याद्रीवरून खाली कोकणात उतरता येते. बोराट्याच्या नाळेलगत लिंगाण्याचा डोंगर आहे. आकाशात उंच गेलेला शिवलिंगासारखा त्याचा सुळका आहे.

लिंगाच्या आकाराचा हा किल्ला महाडपासून ईशान्येस सोळा मैलांवर असून सह्याद्रीच्या मुख्य रांगेत तोरणा व रायगड यांचे दरम्यान आहे. लिंगाण्याचे खडक २९६९ फूट उंच असून त्याची चढण ४ मैल लांबीची आहे. तटबंदी पूर्ण नष्ट झाली आहे, बाकी फक्त काही हौद व धान्य कोठाराच्या खुणा शिल्लक आहेत.

### ४.२.२. गडावरील पाहण्यासारखी ठिकाणे

मोहरी नावाच्या सह्याद्रिमाथ्यावरील गावातून बोराट्याची नाळ (दोन डोंगरांमधील अरुंद वाट) जवळ आहे. ही नाळ चालत जायला बरीच अवघड आहे. येथून जवळच असणाऱ्या रायलिंगहून लिंगाण्याचे दर्शन होते. सिंगापूर या नाळेने जाणे त्या मानाने सोपे आहे. लिंगाण्यावर जाण्यासाठी आधी लिंगणमाचीला जाऊन जननीचे आणि सोमजाईचे दर्शन घेऊन मग लिंगाण्याकडे निघतात. उजवीकडे पाण्याचे एक टाके आहे. पुढील वाट कड्याच्या अगदी टोकावरून जाते. येथे खालून येणारी पायऱ्या ढासळलेली एक वाट आहे. उजव्या बाजूस १५-२० फुटांचा कडा आहे, तिथे एक उंबराचे झाड कडा फोडून बाहेर आले आहे. त्याचाच आधार घेऊन कडा पार करावा लागतो. येथून वर गेल्यावर मग लिंगाण्याच्या त्या उंचावत गेलेल्या शिखराचा तळ आहे. त्याच्या पोटात एक गुहा आहे, तिला सदर म्हणतात. सदरेला एक प्रवेशद्वार

आणि चार खिडक्या आहेत. त्या गुहेला लागूनच एक धान्याचे कोठार असून, पलीकडे जीभीचा पहारा आहे. तिथून माची पसरत गेली आहे.

गुहा प्रशस्त असून ३०-४० माणसे सामावून घेते. समोरच दुर्गराज रायगडावरचा स्थितप्रज्ञ जगदीश्र्वर आपल्याला दर्शन होते. या गुहेवरून पुढे गेल्यावर एक कोरडा हौद व त्यानंतर पुढे चांगल्या पाण्याच्या हौद. इथे एक शिवलिंग आहे, पण कुठे मंदिराचा मागमूसही नाही. या हौदाच्या पुढे, म्हणजे गडाच्या उत्तरेस पायऱ्या आहेत त्याने वर असलेल्या गुहांपर्यंत जाता येते.

इकडे आपल्याला एक शाबूत बांधकाम नजरेस पडते. ग्रामस्थांच्या सांगण्याप्रमाणे इथे दिवा लावत असत, जो कदाचित रायगडावर इशारा देण्यास वापरला जात असे. पण आज ही वाट पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहे. जाण्याऱ्या वाटेवरूनच ही वास्तू दिसते.

लिंगाण्याचे वैशिष्ट्य म्हणजे इथला कठीण चढाईचा सुळका. यावर जायची वाट पूर्णतः घसरडी आहे. दोराच्या सहाय्यानेच इथे चढता येते. या सुळक्याला सर करायला जवळ जवळ ३-४ तास लागतात. काही ठिकाणी तर सरळ कातळ चढावा लागतो. वाट कठीण आहे. मध्ये फक्त एक पाण्याचे कुंड आहे, बाकी कुठेही पाणी नाही. पण सुळका चढून गेल्यावर वेगळाच आनंद मिळतो. या सुळक्याच्या पूर्वेला राजगड आणि तोरणा, तर पश्चिमेस दुर्गराज रायगड आहे.

गडाचे क्षेत्रफळ सुद्धा कमी, म्हणजे जवळ-जवळ २५० चौरस मीटर इतकेच आहे. उत्तरेस ज्या पायऱ्या आहेत त्या टाक्यांकडे नेतात. ती वाटही बिकट झाली आहे. आजमितीस ज्या टाक्यातून पाणी भरले जाते तिथे एक शिवलिंग आहे, ते कुठून आले हा प्रश्र्न पडतो.

## ४.२.३. इतिहास

रायगड जर राजगृह तर लिंगाणा हे कारागृह. इथला बेलाग सुळका आणि निसरडी माती या गोष्टी त्यासाठी अतिशय अनुकूल आहेत.

या अशा अवघड दुर्गावर स्वराज्याच्या शत्रूंना कैदेत ठेवत असत. वर अतिअवघड असा वाट नसलेला सुळका आणि खाली घसरड्या वाटा, त्यामुळे येथे कैद्यांना ठेवल्यावर त्यांच्या मनावर या अवघड स्थितीचा परिणाम होऊन कैदी अगदी खचून

जात असत. पळून जाण्याचा विचारही त्यांच्या मनात येत नसे. जर कोणी कैद्याने पळण्याचा प्रयत्न केला तर त्याला जीव गमवावाच लागे. गडावरचे दोर आणि शिडा काढून घेतल्या की गडावरून पळण्याच्या वाटा बंद.

मोऱ्यांचा पराभव केल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांनी रायगडाजवळ हा किल्ला बांधला. इथल्या गुहेत, जे जुने कारागृह होते, त्यात एका वेळेस ५० कैदी ठेवत. १६६५ सालच्या पुरंदर तहामध्ये रायगड आणि त्या परिसरातले किल्ले लिंगाणा व बाणकोट महाराजांकडेच राहिले. लिंगाण्याच्या गिर्दनवाहीचे जननी व सोमजाई हे देव होते. त्यांच्या नवरात्राच्या उत्सवाची रायगडाच्या जमाखर्चातून तरतूद होत असे. या देवतांना बकरे बळी देण्याची प्रथा होती. लिंगाणा किल्ला रायगडचा पूरक होता. त्याच्या डागडुजीचे काम रायगडाबरोबरच चालत असे. १७८६ सालापर्यंत त्यावरील वास्तूंची देखभाल केली जात असे असा उल्लेख आढळतो. त्यामध्ये गडावरील सदर, बुरूज, दरवाजे आणि धान्यकोठार यांचा समावेश असे. तेथे पर्जन्यकाळात एक मनुष्य गस्त घाली. रायगड नंतर लिंगाणा पडला. रायगडाच्या खोऱ्यात थोडी विश्रांती घेऊन इंग्रजांचे विजयी सैन्य २३ मे रोजी पाली पलीकडील मार्गास लागले.

### ४.२.४. गडावर जाण्याच्या वाटा :

या गडावर जाण्यास प्रथम महाडला यावे लागते. तेथून पाने गावाला जाण्यास सकाळी ११.०० वाजता आणि सायंकाळी ४.०० वाजता बसगाड्या आहेत. पाने गावातून साधारण पाऊण तासाच्या चढणीनंतर लिंगाणा माचीवर पोहोचता येते. तिथे पाणी भरून पुन्हा पाऊण तास चढल्यावर घसरड्या वाटेवरून माणूस अर्ध्या तासात लिंगाणा सुळक्याच्या पायथ्याशी असलेल्या गुहेपाशी येतो. ही वाट फारच अवघड आहे. सुरक्षेची काळजी घेतल्याशिवाय वर जाता येत नाही.

**प्रकरण पाच :**

## किल्ले मुरुड-जंजीरा व किल्ले सुधागड

### ५.१. किल्ले मुरुड - जंजीरा

रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यात राजापुरी खाडीच्या तोंडावर वसलेला,व चारी बाजूंनी अरबी समुद्राच्या पाण्याने वेढलेला अजिंक्य-बेलाग जलदुर्ग दिमाखात उभा आहे त्याचे नाव आहे जंजिरा किल्ला किंवा मुरुड जंजिरा किल्ला.

### ५.१.१. जंजिरा किल्ल्याचा इतिहास

जंजिरा हा शब्द अरबी भाषेतील जझीरा या शब्दावरून आला आहे,जझीरा याचा अर्थ बेट असा होतो.राजापुरी हे पूर्वी कोळी लोकांची वस्ती असलेले गाव होते.समुद्री चाचे व लुटारू यांचा नेहमी होणारा त्रास कमी करण्यासाठी कोळी लोकांनी या छोट्या बेटावर लाकूड-ओंडक्यांचा वापर करून छोटी तटबंदी असलेला मेढेकोट तयार केला.सर्व कोळी लोक या मेढे कोटात सुरक्षितपणे राहू लागले.मेढेकोट बांधण्यासाठी या परिसरावर वर्चस्व असलेल्या निजामाची परवानगी घ्यावी लागे.

मेढे कोटाचा प्रमुख राम पाटील याच्या नेतृत्वाखाली कोळी बांधव सुरक्षितपणे राहू लागले,कारण राम पाटील हा शूर व पराक्रमी कोळी नेता होता.कालांतराने राम पाटलाचे सैन्यबळ वाढले,त्याने निजामाच्या ठाणेदाराला जुमानने बंद केले. राम पाटलाचे वाढते वर्चस्व पाहून त्याचा बंदोबस्त करण्यासाठी निजामाने पीरमखान या सरदाराची नेमणूक केली.

पीरमखान हा सरदार व्यापाऱ्याचे सोंग घेऊन मेढे कोटात दाखल झाला व सर्व कोळ्यांना दारू पाजून धुंद केले व रात्रीच्या अंधारात गलबता तून आलेले सैन्य उतरवून त्याने सर्व कोळी लोकांची कत्तल करून मेढे कोट ताब्यात घेतला. पीरमखाना नंतर या मेढे कोटावर बुऱ्हाणखान याची किल्लेदार म्हणून नेमणूक झाली. बुऱ्हाणखानाने निजामाकडे इथे एक भक्कम किल्ला बांधण्याची

परवानगी मागितली.सध्या आपण जंजिरा किल्ल्यावरील पाहतो ते बांधकाम बुऱ्हाणखान याच्या काळातील आहे.जंजिरा किल्ल्याचे नाव **'किल्ले मेहरूब किंवा किल्ले जंजिरा'** असे होते.इ.स.१६१७ मध्ये सिद्धी अंबर याने बादशाह कडून मुरुड प्रांताची सनद व जहागिरी मिळवली.(सिद्धी हे मुळचे आफ्रिकन वंशाचे मुस्लीम लोक अरबांच्या सैन्यातून भारतात दाखल झाले,कुशल खलाशी,काटक व शूर सैनिक म्हणून त्यांची ओळख होती.)१६२५ मध्ये मलिक अंबर मरण पावला.त्याच्यानंतर २० सिद्धी राजकर्त्यांनी ३३० वर्षे जंजिरा ताब्यात ठेवला.

अनेकांनी हा किल्ला जिंकण्याचा प्रयत्न केला पण कोणीही यशस्वी होऊ शकले नाही.छत्रपती शिवाजी महाराजांना ही किल्ला जिंकता आला नाही.शिवाजी महाराजांच्या मावळ्यांनी जंजिरा जिंकण्यासाठी एकूण तीन स्वाऱ्या केल्या परंतु तिन्ही स्वाऱ्या अपयशी ठरल्या संभाजी महाराजांनी जंजिरा जिंकण्यासाठी जंजिरा किल्ल्यापासून पाच-सहा कि.मी.अंतरावर समुद्रात एका बेटावर पद्मदुर्ग किल्ला उभारला परंतु जंजिरा जिंकण्यात त्यांनाही  अपयश आले. सिद्धी महमद खान हा शेवटचा सिद्धी,याच्या काळात अजेय असे जंजिरा संस्थान ३ एप्रिल १९४८ रोजी भारतीय प्रजासत्ताका मध्ये सामील झाले.

## ५.१.२. जंजिरा किल्ल्याची बांधणी व रचना :

राजापुरी किनाऱ्यापासून समुद्रामध्ये काही अंतरावर जंजिरा हा किल्ला आहे.किल्ल्याचा महादरवाजा पूर्व दिशेला आहे.दरवाजातून आत गेल्यानंतर एक प्रवेशद्वार असून त्यावर एक शिलालेख असून त्यावर एका वाघाने चारही पायात एक-एक हत्ती पकडला असून शेपटी मधेही एक हत्ती गुंडाळला आहे असे चित्रित केले आहे.यातून बुऱ्हाण खान स्थानिक सत्ताधार्यांना असे सूचित करतो कि,तुम्ही भलेही हत्ती सारखे बलशाली असाल,परंतु मी वाघासारखा शूर आहे.अंतर्भागात एकूण बावीस एकर जागेवर हा किल्ला असून किल्ल्याची तटबंदी ४० फुट उंचीची आहे.किल्ल्याला एकोणीस बुरुज असून सर्व बुरुज गोलाकार व भक्कम आहेत.दोन बुरुजामध्ये ठराविक अंतर आहे.तटबंदी वर जाण्यासाठी ठिकठिकाणी दगडी पायऱ्या आहेत.तटबंदी च्या प्रत्येक कमानीत तोफा ठेवलेल्या आहेत.किल्ल्यावर एकूण ५१४ तोफा असल्याचा उल्लेख आढळतो.किल्याच्या अंतर्भागात एक भव्य वाडा पडक्या अवस्थेत आहे.दोन गोड्या पाण्याचे तलाव किल्ल्यावर दिसून येतात.

### ५.१.३. शिवाजी महाराजांच्या जंजिरा मोहिमा:

शिवाजी महाराजांनी जंजिरा किल्ला ताब्यात घेण्यासाठी पहिली मोहीम १४ ऑगस्ट १६५७ रोजी रघुनाथ बल्लाळ सबनीस यांचेकडे सोपवली.पण या मोहिमेत अपयश आले. यानंतर दुसरी मोहीम १६६९ च्या मे महिन्यात आखण्यात आली या मोहिमेची आखणी महाराजांनी स्वतः केली.यामध्ये पायदळाने दंडा-राजपुरीवर तर नौदलाने एकाच वेळी स्वारी करायची व जंजीर्याची कोंडी करायची अशी योजना होती.जंजिर्याचा सिद्धी फतेखानाचे सात किल्ले काबीज करून मराठे दंडा-राजपुरीला भिडले.(नोव्हेंबर १६६९)मराठा आरमारापुढे जंजिरा किल्ल्यावरील कलाल बांगडी तोफेचे काही चालले नाही.जंजिरा कोंडीत सापडल्याचे पाहून सिद्धीने मुंबईच्या इंग्रजांकडे मदत मागितली,परंतु इंग्रजांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही.शेवटी सिद्धी महाराजांशी तहाची बोलणी करू लागताच त्याचे सरदार क्रोधीत झाले व त्यांनी फतेखानाला कैद केले व सत्ता ताब्यात घेतली.त्यांनी औरंगजेबाकडे मदत मागितली.औरंगजेबानेही जंजिरा किल्ल्याचे महत्व ओळखून सुरतेहून गलबतांचा ताफा पाठवल्यामुळे शिवाजी महाराजांना ही मोहीम (डिसेंबर १६६९)सोडून द्यावी लागली. तिसरी मोहीम १६७१ मध्ये हाती घेण्यात आली,परंतु त्या मोहिमेत ही महाराजांच्या पदरी यश आले नाही.असा हा जंजिरा महाराजांसाठी शेवट पर्यंत अजिंक्यच राहिला.

### ५.१.४. किल्ल्यावर पाहण्यासारख्या बाबी :

#### ५.१.४.१. शिलालेख:

किल्ल्याच्या प्रवेश द्वारावर पारशी मध्ये एक लेख लिहिला आहे तसेच प्रवेश द्वारावर दोन्ही बाजूला गजांत लक्ष्मी चे चित्र कोरलेले पाहायला मिळते.

#### ५.१.४.२. किल्ल्यावरील तोफा:

जंजिरा किल्ल्याचे प्रमुख आकर्षण म्हणजे **कलाल बांगडी तोफ**. बारा कि.मी. अंतरापर्यंत मारा करू शकणारी ही तोफ आकाराने खूप मोठी आहे.मिश्र धातू पासून बनवलेली ही तोफ उन्हामधेही तापत नाही.भारतामधील प्रमुख पाच तोफा मध्ये

तिचा समावेश होतो.याच बरोबर लांडा कासम, चावरी व अशा अनेक तोफा किल्ल्याच्या तटबंदी वर पाहायला मिळतात.

### **५.१.४.३. सुरूलखानाचा वाडा**:

प्रवेशद्वारातून आत आल्यास तीन माजली भक्कम पण पडक्या अवस्थेतील एक इमारत दिसते.हाच सुरूलखानाचा वाडा होय.

### **५.१.४.४. गोड्या पाण्याचे तलाव** :

किल्ल्यावर दोन मोठे गोड्या पाण्याचे तलाव पाहायला मिळतात.याच तलावाचे पाणी पिण्यासाठी वापरले जात होते.

### **५.१.४.५. सदर:**

तलावापासून दगडी पायऱ्या वरून वरच्या बाजूला गेले असता.किल्ल्याची सदर पाहायला मिळते.

### **५.१.४.६. पश्चिम दरवाजा** :

किल्ल्याच्या पश्चिम दिशेला तटबंदी च्या खालून बाहेर समुद्राच्या दिशेला जाण्यासाठी एक दरवाजा आहे.यालाच दर्या दरवाजा असे म्हणतात.संकटकाळी किल्यातून बाहेर पडून समुद्रा मार्गे गलबतातून निघून जाण्यासाठी याचा वापर होई.

## **५.१.५. जंजिरा किल्ल्यावर पोचण्यासाठी मार्ग**

**मुरुड-जंजिरा किल्ल्या पर्यंत येण्यासाठी तीन मार्ग आहेत.**

अ) अलिबाग मार्गे:- मुंबई किंवा पुण्यावरून वरून येणारे पर्यटक अलिबागला येऊन रेवदंडा मार्गे मुरुड-जंजिरा किल्ल्यावर येऊ शकतात.मुरुड गावातून राजापुरीसाठी बस अथवा खाजगी वाहन मिळते.

ब) पाली-रोहा-नागोठणे-साळाव-नांदगाव मार्गे जंजिरा किल्ल्यापर्यंत येऊ शकतात.

क)महाड च्या दिशेने येणारे पर्यटक महाड-माणगाव-म्हसळा-दिघी बंदरा पर्यंत येऊन बोटीने जंजिरा किल्ल्याकडे येऊ शकतात.

## ५.२. किल्ले सुधागड :

### ५.२.१. भौगोलिक स्थान :

सुधागड म्हणजे भोर संस्थानाचे वैभव. पूर्वी या गडाला भोरप असेही म्हणत असत. पुढे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री शिवछत्रपतींचा पदस्पर्श या गडाला झाला आणि याचे नाव सुधागड ठेवले गेले. या गडाची साधारणतः उंची ५९० मीटर आहे. झाडांमध्ये लपलेला हा गड विस्ताराने फारच मोठा आहे. या गडावर जाण्यासाठी तीन प्रमुख वाटा आहेत.

भोर संस्थानाचे वैभव असलेला सुधागड किल्ला म्हणजे पुण्यातून कोकणात उतरणाऱ्या सवाष्णीच्या घाटाचा पहारेकरी. अतिशय प्रशस्त असे पठार असलेला हा किल्ला एक प्राचीन किल्ला आहे. सुधागड परिसरातील ठाणाळे आणि खड्सांबळे लेण्यांचे अस्तित्व असल्यामुळे ते सिद्ध होते. याला पहिले भोरपगड असेही म्हणत. सुधागड अगदी पुणे आणि रायगडच्या सीमेलगत आहे. रायगड मधील तालुक्याचे नावही सुधागड-पाली तालुका असे आहे.

### ५.२.२. इतिहास :

शिवाजी महाराजांनी १६५७-५८ मध्ये जेव्हा आदिलशाही मुलुख जिंकला त्या वेळी सुधागडावर हा किल्ला स्वराज्यात सामील झाला असावा. नारो मुकुंद सबनीस यांच्या कडे गड होता. शिवरायांनी या गडाचे भोरपवरून सुधागड असे नामकरण केले. राजधानीसाठी याही गडाचा विचार शिवरायांनी केला होता, असे सांगितले जाते.

इ.स. १६९४ साली याबाबत असा उल्लेख आढळतो की, 'साखरदर्यात मालवजी नाईक कारके यांनी माळ लाविली. सरदार मालोजी भोसले यांच्या हाताखाली जाधव आणि सरनाईक हे प्रथम किल्ल्यावर चढले. या धारकऱ्यांना उभे करून त्यांचे पाठीवर हैबतराव चढले. त्यास संभाजीराव पुढे जाऊन माथा गेले. पंचविसाने पुढे जाऊन गस्त मारिली. बोकडसिलेचा पहारा मारला. पुढे भोराईच्या टप्प्यावरी गेले तो

सदरेतून किल्लेदार व लोक धावत आले. हाणहाण झाली त्या समयी किल्लेदार कामास आले. उपरांतिक जाऊन सदर काबीज केली.'

गडाच्या पायथ्याशी असलेल्या 'पाच्छापूर' या गावातच छत्रपती संभाजी राजे व औरंगजेबाचा बंडखोर मुलगा अकबर याची भेट झाली होती. महाराजांच्या अष्टप्रधान मंडळात असलेल्यांपैकी अण्णाजी दत्तो, बाळाजी आवजी चिटणीस, त्याचा मुलगा आवजी बल्लाळ, आणि हिरोजी फर्जंद या सर्वांना भाद्रपद पौर्णिमेच्या दिवशी छत्रपती संभाजी राजांनी सुधागड परिसरात असणाऱ्या परली गावात हत्तीच्या पायी दिले.

## ५.२.३. गडावरील पाहण्यासारखी ठिकाणे :

### ५.२.३.१. पंत सचिवांचा वाडा :

पंत सचिव हे पद मूलतः "सुरनीस" म्हणून ओळखले जायचे. सुरनीस हा शब्द फारसी असून त्याचा अर्थ छत्रपतींनी दिलेल्या सनदा, वराती, हुकुमनामे यावर 'सुर सुद बार' असे शेरे मारणारा. व्यापक राज्यव्यवस्थेत या कामाच्या प्रमुखासच सुरनीस असे म्हणू लागले. राज्याभिषेकाच्या वेळी पंत सचिव असे नाव देऊन त्या पदावर अनाजी दत्तो यांची नेमणूक केली. पंत सचिवांना वर्षाला पाच हजार होण असा पगार असे. छत्रपती संभाजी महाराजांनी गादीवर आल्यावर त्यांच्या विरुद्ध कट कारस्थाने केली म्हणून अनाजींना प्रथम सचिवपद काढून कैदेत बसवले, परंतु नंतर मुक्त करून त्यांची पुन्हा सचिवपदी नेमणूक झाली. त्यानंतर रामचंद्र नीलकंठ हे पंत सचिव झाले. छत्रपती राजाराम महाराजांनी भोरप्या गडावरील सबनीस नरो मुकुंद यांच्या मुलाला शंकरजी नारायण याला पंत सचिव केले. शंकरजी नारायण याने पुढील काळात अतुलनीय पराक्रम करून मोगली सैन्यापासून राज्याचा बचाव केला. इ.स. १७१४ च्या सुमारास छत्रपती शाहू महाराजांनी त्यांना सचिव पद वंशपरंपरेने दिले. त्यानंतर त्यांचे वंशज परंपरेने त्या पदावर बसत होते. इंग्रजी अमदानीत पंत सचिवांना संस्थानिक म्हणून मान्यता मिळाली. भोर संस्थानाचे ते राजे झाले. आजही भोर मध्ये पंत सचिवांचे घराणे चालू आहे.

महाराजांच्या अष्टप्रधान मंडळात असलेल्यांपैकी अनाजी दत्तो, बाळाजी आवजी चिटणीस, त्याचा मुलगा आवजी बल्लाळ आणि हिरोजी फर्जंद या सर्वांना भाद्रपद पौर्णिमेच्या दिवशी छत्रपती संभाजी राजांनी सुधागड परिसरात असलेल्या परली गावात हत्तीच्या पायी दिले.

### ५.२.३.२. भोराई देवी मंदिर - वीरगळ:

वाड्यापासून जवळच भोराई देवीचे मंदीर आहे . मंदीर मोठे आणि सुस्थितीत आहे . मंदीरात एक व्याघ्रमुर्ती आहे आणि सभामंडपात एक भली मोठी घंटा देखील आहे. देवीची मूर्ती खूप सुंदर असून तिच्या दर्शनासाठी अनेक भाविक येत असतात. मंदिराच्या आवारात एक दिपमाळ आहे . दिपमाळेत हत्ती कोरला आहे. दिपमाळेच्या सर्व भर त्या हत्तीने उचलला आहे असे आपल्याला वाटते . मंदिराच्या आवारात जवळ जवळ ३६ वीरगळी आहेत.वीरगळ म्हणजे वीर पुरुषांच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेला (सहसा - दगडांचा अथवा लाकडाचा) स्तंभ असतो. यास वीरस्तंभ असेही म्हणतात. महाराष्ट्रात जुन्या देवळांच्या बाहेर वीरगळ आढळतात. भोराई देवीच्या मंदिराच्या मागील बाजूस अनेक समाध्या आहेत. त्यांवर सुबक नक्षीकाम आहे.

### ५.२.३.३. तैलबेला व घनगड:

सह्याद्रीची रचना ज्वालामुखीच्या उद्रेकामुळे बाहेर आलेल्या लाव्हा रसामुळे झालेली आहे. या लाव्हरसाचे थर थंड होतांना अनेक वैशिष्ट्यपूर्ण रचना तयार होतात. त्यापैकी एक रचना म्हणजे "डाईक" तैलबैला उर्फ कावडीचा डोंगर हे अशा रचनेचे एक उत्तम उदाहरण आहे. डाईक म्हणजे लाव्हारसाच्या विशिष्ट प्रकारे साठण्यामुळे व थंड होण्यामुळे बेसॉल्ट खडकाची तयार झालेली भिंत. तैलबैलाचा डोंगर हा अशाच प्रकारच्या दोन कातळभिंतीमुळे लक्ष वेधून घेतो.प्राचीन काळापासून कोकणातल्या बंदरांमध्ये उतरणारा माल घाटावरील बाजारपेठांमध्ये आणला जात असे. या मार्गाचे रक्षण करण्यासाठी बंदरापासून बाजारपेठे पर्यंत किल्ल्यांची साखळी बनवलेली असे. त्यातील एक म्हणजे "वाघजाई घाट ". या घाटावर लक्ष ठेवण्यासाठी तैलबैलाचा उपयोग करण्यात येत असावा. तैलबैला ते ठाणाळे लेणी हा प्राचीन

घाटमार्ग आजही वापरात आहे. तैलबैला वरून नैऋत्येस सुधागड, आग्नेयेस घनगड आणि ईशान्येस कोरीगड नजरेस पडतात. मुळशी धरणाच्या पश्चिमेला असलेल्या मावळाला 'कोरसबारस' मावळ म्हणतात. याच मावळात येणारा हा घनगड हा आड बाजूला असलेला छोटेखानी किल्ला आहे. पाली - सरसगड - सुधागड - सवाष्णीचा घाट - घनगड - तैलबैला - कोरीगड असा प्राचीन मार्ग होता .

## ५.२.३.४. महादरवाजा / दिंडी दरवाजा :

भोराईदेवीच्या दर्शनानंतर एका हनुमान मंदिराकडून एक वाट खालच्या बाजूस जाते . थोड्या दाट जंगलातून जाणारी ही वाट प्रशस्त असून ती महादरवाजाकडे जाते . या दरवाज्यास दिंडी दरवाजा असेही म्हणतात म्हणतात. सवाष्णीच्या घाटावरून येणारी वाट दिंडी दरवाज्यात आणून सोडते. रायगडावरील महादरवाजा आणि दिंडी दरवाजा एक सारखेच दिसतात आणि त्यांची संरचना मिळती जुळती आहे . द्वाराची रचना गोमुखी बांधणीची आहे. दोन भीमकाय बुरुजामध्ये लपल्यामुळे या द्वारास मोठे संरक्षण लाभले आहे. प्रवेशद्वारावर २ सुंदर कोरलेले शरभ आहेत. महादरवाजामध्ये बंदुकिंसाठी जंग्या आहेत.

## ५.२.४. गडावर पोचाण्यासाठीचे मार्ग :

गडावर पोचण्यास २ वाटा आहेत - ठाकूरवाडी अथवा दर्यागावातून पालीपासून भिरा कडे जाणाऱ्या हमरस्त्यावर ८ किमी वर पाच्छापूर गाव आहे. येथून पुढे ठाकूरवाडी अथवा दर्यागाव वसलेले आहे. येथून एका सोप्या पायवाटेने गडावर २ तासात आपण पोचतो. ठाकूरवाडीतून वर जाताना मध्ये लोखंडी शिडी लागते. पाच्छापूर गावातूनही एक वाट वर येते. या दोन्ही वाटा एका घळीपाशी मिळतात. येथे महाकाय चिलखती बुरुज आपले स्वागत करतात. या घळीतून वर गेल्यावर आपण एका पडक्या दरवाजातून जातो, हाच पाच्छापूर कडील दरवाजा. येथून आपण १५ मिनिटे चढल्यावर गडमाथ्यावर पोचतो. धोंडसे गावातून पालीहून नाडसूर / धोंडसे गावी पोचून आपल्याला येथून दगडी पायऱ्यांच्या मार्गाने गडावर पोचता येते. इथली वाट झाडीतून असल्यामुळे सुखद आहे, पण येथून चढण्यास अंदाजे २.५ ते ३ तास लागतात. तेलबैला जवळून उतरणारा सवाष्णीचा घाट हा आपल्याला याच मार्गावर घेऊन येतो.

## प्रकरण सहा

## ६.१ निष्कर्ष :

कोकण हा सह्याद्री पर्वत रांगांमुळे महाराष्ट्राच्या इतर प्रदेशापासून वेगळा पडला आहे. या प्रदेशातील घनदाट जंगल असलेला सह्याद्रीचा पर्वतमय प्रदेश, अरबी समुद्र, खाड्या व समुद्रातील बेटे आहेत. घनदाट जंगल असलेल्या सह्याद्रीमुळे कोकणामध्ये किल्ल्यांमधील अंतर खूपच कमी आहे. रायगड जिल्ह्याच्या भौगोलिक स्थितीने किल्ल्याच्या उभारणीस पोषक स्थळे पुरवली. सह्याद्री डोंगररांगांनी गिरिदुर्ग तर समुद्रापर्यंत पोहचलेल्या डोंगर सुळक्यांनी व समुद्रातील बेटांनी जलदुर्ग उभारण्यास पोषक स्थळे पुरवली. हा प्रदेश घनदाट जंगल व खोल दऱ्या यांच्यामुळे तो सहजपणे वेगवेगळा करता येणे अशक्य आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी या भौगोलिक वैशिष्ट्याचे लष्करी महत्त्व बरोबर ओळखले. त्यांनी या प्रदेशांमध्ये किल्ले दुरुस्ती व बांधणी केली. त्यांनी लष्करी डावपेचांसाठी तसेच या प्रदेशावर कायम वर्चस्व टिकविण्यासाठी किल्ल्यांच्या रुपात संरक्षक स्थळे निर्माण केली. अनेक पुरातन ग्रंथांमध्ये कोकण प्रांताविषयीचे उल्लेख सापडतात. कोकणचा अपरांत (पश्चिमेकडील टोक) या नावानेही उल्लेख सापडतो. कालिदासाच्या रघुवंश या नाटकामध्ये अपरांत या नावाचे वर्णन आहे. इ.स.पूर्व ४ थ्या शतकापासून असे उल्लेख नजरेस पडतात. हरिवंश, विश्णू पुराण, बृहत्संहिता, राजतरंगिणी यासारख्या ग्रंथांमध्ये अपरांताचे वर्णन असल्याचे आढळते. विविध शिलालेख तसेच प्लिनी, टॅलेमी, ह्यू-एन-त्संग, इब्न बतुता, अल् बरूनी या परकीय प्रवाशांच्या वृतामध्येही कोकण प्रांताचा उल्लेख सापडतो.

रायगड जिल्ह्याच्या भूप्रदेषावर इतिहास काळातील वेगवेगळया राजसत्तांनी  आपले वर्चस्व प्रस्थापित केले होते. या राजसत्तांचा क्रमवार व सुसंगत इतिहास लिखित स्वरूपात सापडत नाही. मात्र जो इतिहास सापडतो त्यात वेगवेगळ्या कालखंडात विविध राजसत्तांचा  या जिल्ह्यावर प्रभाव असल्याचे दिसून येते.

जावळीच्या विजयानंतर शिवाजी महाराजांनी रायगड जिल्ह्याच्या उत्तर भागावर आपले लक्ष केंद्रित केले. कल्याण-भिवंडीकडे मोहीम काढली व त्या भागातील डोंगरी

किल्ले जिंकण्यास सुरूवात केली. त्यामुळे सुधागड-पाली, कर्जत, पेण या तालुक्यांतील भूप्रदेषावर मराठी सत्तेचा प्रभाव निर्माण झाला.

शिवाजी महाराजांनी युरोपीय सत्तांचा धोका ओळखला होता. त्यामुळे या सत्तांना शह देण्यासाठी भक्कम आरमाराची निर्मिती सुरू केली. कुलाबा किल्ला हे आरमाराचे प्रमुख केंद्र बनविले.

शिवाजी महाराजांनी रायगड जिल्ह्याचा बहुतांशी भाग किंबहुना संपूर्ण कोकण किनारपट्टी ताब्यात घेतल्यानंतर स्वराज्य संरक्षणासाठी या प्रदेशाची उपयुक्तता जाणली आणि याच भूप्रदेषातील रायगड हा अभेद्य व दुर्गम असा किल्ला राजधानीसाठी निवडला. १६६४ च्या सुरतच्या लुटीतून त्यांनी रायगड किल्ल्याची मजबूत बांधणी केली. पुढे ६ जून १६७४ रोजी त्यांनी रायगडावर राज्याभिषेक करून घेतला .

प्रस्तुत प्रकल्पामध्ये दिलेल्या माहितीवरून असे लक्षात येते कि अगदी प्राचीन कालखंडापासूनच किल्ल्यांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. या किल्ल्यांच्या सहाय्यानेच अनेक सत्ताधीशांनी आपल्या साम्राज्याचा पाया भक्कम केला. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यकारभारात किल्ल्याचे महत्त्व जाणून घेऊन या किल्ल्यांचा उपयोग योग्यप्रकारे राज्यकारभारासाठी करून घेतला.

## ६.२ छायाचित्रे :



किल्ले रायगड




पाचाडचा जिजाबाईंचा वाडा



महादरवाजा (रायगड)



गंगासागर तलाव (रायगड



पालखी दरवाजा (रायगड)




राजसभा (रायगड)



नगारखाना(रायगड)




बाजारपेठ (रायगड)




जगदीश्वर मंदिर (रायगड)



महाराजांची समाधी (रायगड)



हिरकणी बुरुज(रायगड)



किल्ले लिंगाणा



किल्ले मुरुड-जंजीरा



कलाल बांगडी तोफ (मुरुड-जंजीरा)



गोड्या पाण्याचे तलाव (मुरुड-जंजीरा)




पंत सचिवांचा वाडा (सुधागड)



किल्ले सुधागड



भोराई देवी मंदिर (सुधागड)



तैलबेला घनगड (सुधागड)


महा दरवाजा / दिंडी दरवाजा (सुधागड)

### ६.३ संदर्भ :

१) शांताराम आवळसकर., रायगडची जीवनकथा, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ १९६२

२) प्रा. अरविंद मनवर., रायगड जिल्हा, अजिंक्य प्रकाशन

३) साद सह्याद्रीची ! भटकंती किल्ल्यांची!! , प्र.के.घाणेकर

४) https://raigad.gov.in

५) Mr.wikipedia.org/wiki/रायगड किल्ला

६) visionraigad.in/node/281